विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक दुसरा । फेब्रुवारी २०२४

नवसे कन्यापुत्र होती ।
तरि का करणे लागे पती ।।

ऐसे कैसे झाले भोंदू।
कर्म करोनि म्हणती साधू।।
अंगा लाउनिया राख।
डोळे झाकुनि करिती पाप।।

मुखें बोले ब्रह्मज्ञान ।
मनीं धन अभिमान ।।
ऐसियाची करी सेवा ।
काय सुख होय जीवा ।।
पोटासाठीं संत ।
झाले कलींत बहुत ।।
विरळा ऐसा कोणी ।
तुका त्यासि लोटांगणी ।।

बरा देवा कुणबी केलो ।
नाही तरी दंभे असतो मेलो ।।



भुके नाही अन्न ।
मेल्यावरी पिंडदान।।
हे तो चाळवाचाळवी ।
केले आपणचि जेवी ।।

भूत भविष्य कळों यावें वर्तमान ।
हें तों भाग्यहीन त्यांची जोडी ।।
जगरूढीसाठी घातले दुकान ।
जातो नारायण अंतरोनि ।।

सत्य–असत्याशी मन केले ग्वाही ।
मानियेले नाही बहुमता ।।

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दाचीच शस्त्रे यत्ने करू ।।
शब्दचि आमुच्या जिवाचें जीवन ।
शब्दें वांटू धन जनलोकां ।।
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव ।
शब्देंचि गौरव पूजा करू ।।

# राज्य कार्यकारिणी बैठक । जळगाव । क्षणचित्रे

दि. १३-१४ जानेवारी २०२४

**मनोगत व्यक्त करताना**



राज्य अध्यक्ष
**भाई अविनाश पाटील**



राज्य कार्याध्यक्ष
**माधव बावगे**



तज्ज्ञ विश्लेषक
**डॉ. संग्राम पाटील**



आय.ए.एस.अधिकारी
**राजेश पाटील**



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या
**प्रतिभा शिंदे**



जिल्हाध्यक्ष
**नेमिचंद धांडे**



जिल्हा कार्याध्यक्ष
**रवींद्र चौधरी**



जिल्हा प्रधानसचिव
**प्रल्हाद बोऱ्हाडे**




**राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव आणि कार्यकर्ते**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे–पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली–४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  आरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/–
- **पृष्ठ संख्या** : ४०

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
आम्ही वारस विवेकाचे
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्ष तिसरे । अंक दुसरा । फेब्रुवारी २०२४**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय...** ४
- **अभिवादन**
  गदर : एक क्रांतिकारी शाहीर / योगेश कुदळे ५
- **विज्ञान विश्व**
  ॲटोसेकंद : भौतिकशास्त्र ज्ञानशाखेचा सन्मान/डॉ.विजय कुंभार, डॉ.केशव राजपुरे ८
- **बुवाबाजी**
  बुवाबाजीचा स्पर्धा परिक्षार्थींमध्ये प्रवेश / विशाल विमल १२
- **युवा विश्व**
  स्मशानभूमीतला वाढदिवस / अभय कुंभार १५
  प्रेम : जगण्याची एक सुंदर भावना / रेश्मा खाडे १७
- **संतांचिये द्वारी**
  वारकरी परंपरेतील मुस्लीम / प्रा. मदन सोनवणे १९
  तुकाराम आणि परधर्म जाणिवा / विनायक होगाडे २३
- **संघटन**
  संगठन गढे चलो / विनायक सावळे २६
- **राज्य कार्यकारिणी बैठक**/ डॉ.टी.आर.गोराणे ३०
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३३
- **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे** / उत्तम जोगदंड ३८

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर–४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

# पणतीची भूमिका निभावण्याची गरज...

दैववाद, कर्मकांड आणि धार्मिकता याचा प्रचार आणि प्रसार आज कमालीचा शिगेला पोहोचला आहे. या प्रसारासाठी ज्या माध्यमांचा आणि साधनांचा वापर करण्यात येत आहे त्यांचा आढावा घेतला, तर आपणाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचं महत्त्व समजून येईल. २८ फेब्रुवारी हा 'विज्ञान दिन' म्हणून साजरा करीत असताना थोडे मागे वळून पाहावेच लागेल किंबहुना विज्ञान आणि धर्म यामधील द्वंद्व समजून घ्यावं लागेल. वैज्ञानिक सत्य सांगण्याची किंमत मोजणाऱ्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करावीच लागेल. 'पृथ्वीभोवती सूर्य फिरत नसून सूर्याभोवती पृथ्वी फिरते' हे वक्तव्य केल्याबद्दल सन १६३२ मध्ये गॅलिलिओला तुरुंगवास भोगावा लागला होता. परंतु कालांतराने धर्माच्या वर्तनात सुधारणा झाली आणि 'गॅलिलिओला आम्ही चुकीची शिक्षा दिली' असं म्हणत तत्कालीन ख्रिश्चन धर्मगुरू पोप जॉन पॉल द्वितीय यांनी संपूर्ण जगाची माफी मागितली होती. पण या माफिनाम्यासाठी ३१ ऑक्टोबर, १९९२ हा दिवस उजाडावा लागला. धर्माला वैज्ञानिक महत्त्व समजले, पण गॅलिलिओच्या मृत्यूनंतर तब्बल ३५० वर्षांनी. एवढ्या वर्षांनंतर चुकीची दुरुस्ती करणं ही सुद्धा वाटते तितकी सहज आणि सोपी गोष्ट नाही. आपल्याकडे समाजसुधारकांना जी हीन आणि तुच्छतेची वागणूक देण्यात आलेली होती, त्याबद्दन आजअखेर कोणत्याही धर्माकडून माफी मागण्यात आलेली नाही. हे समजून घेतलं तरच माफिनाम्याचं महत्त्व समजून येईल. एवढेच काय इटलीच्या फिलिपो ब्रुनोने पृथ्वीसारखं दुसरं विश्व असण्याची शक्यता वर्तवल्याबद्दल धर्माने त्याला जी शिक्षा दिली, त्याची आपण कल्पनाच करू शकत नाही. १७ फेब्रूवारीला, १६०० मध्ये रोमच्या चौकात त्याला जाहीररीत्या जाळण्यात आले होते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी एक ना अनेकांनी सत्य सांगण्याची किंमत मोजलेली आहे. म्हणून तर आज आपण सुखी आणि समृद्ध जीवन जगत आहोत.

वैज्ञानिकांच्या बरोबरच संतांनी देखील सत्य सांगण्याची किंमत मोजलेली आहे. सत्य सांगण्यासाठी मात्र त्यांनी आध्यात्मिकतेची कास धरलेली दिसून येते. जिंदा बाप कोई ना पूजे। मरे के बाद पुजवावे।। अशा कडक शब्दांत निर्भिडपणे आसूड ओढणारे संत कबीर, जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा।। असा संदेश देणारे संत तुकाराम असोत या सर्वांनी समाज हिताचाच विचार केला. देव मंदिरात न शोधता माणसातला देव शोध हा मोलाचा संदेश संतांच्या वाणीतून येत होता. गाडगे महाराजांनी 'देवकीनंदन गोपाला' चा गजर करीत मिळवलेले करोडो रुपये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेसाठी बहाल केले. शिक्षणाच्या माध्यामातूनच जनसामान्यांचा विकास होऊ शकतो, हे त्यांनी जाणले होते. आज शिक्षण व्यवस्थेकडे होणारे दुर्लक्ष, शाळा-महाविद्यालयांच्या इमारती, तेथील शिक्षण व्यवस्था आणि त्याच वेळेला धार्मिकतेवर होणारा खर्च किंवा उधळपट्टी यांची तुलना करता येणे अशक्यप्राय होऊन बसलेलं आहे. बुद्धिवादी वर्ग तर आज 'आळीमिळी गुपचिळी' प्रकारे शांत असून तरुणाई अत्यंत उत्साहाने सध्या सुरु असलेल्या धार्मिक माहोलमध्ये रममाण होत आहे. मध्यमवर्ग यात सामील होण्यातच धन्यता मानत असल्याचे पदोपदी जाणवते.

ज्या काळात धर्माचे प्राबल्य होते त्या काळातील संतांनी सत्य सांगण्यासाठी उचललेलं पाऊल धाडसीच म्हणावं लागेल. खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं म्हणण्याची आज नितांत गरज आहे. समाजात पसरत असलेली अवैज्ञानिक दृष्टी, दैववाद, धार्मिक विद्वेष इ. कमी करण्याचा प्रयत्न करायलाच हवा. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुखी केलं, पण त्याचबरोबर विज्ञान व तंत्रज्ञानातून उपलब्ध झालेल्या या माध्यमाचा गैरवापर वैज्ञानिक दृष्टिकोनाला तिलांजली देण्यामध्येच होतोय की काय, अशी शंका निर्माण होते आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरत चिकित्सकपणे नवविचार मांडण्याची उर्मी समाजात भिनवावी लागेल. अन्यथा येणाऱ्या पिढ्या आपणाला कदापिही माफ करणार नाहीत. अस्ताला जाणारा सूर्य एकदा गर्वाने म्हणतो की, 'मी गेल्यानंतर या जगाला प्रकाश कोण देणार?' तेव्हा कोपऱ्यात तेवत असलेली एक पणती म्हणते अस्तानंतरची काळजी तुम्ही करू नका. तुम्ही गेल्यानंतर जगाला प्रकाश देण्याचा प्रयत्न माझ्या परीने मी करीन.' हे वाक्य जरी काल्पनिक असले, तरी समाजात पणतीची भूमिका निभावण्याची आज नितांत गरज आहे...

**संपादक**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# गदर : एक क्रांतिकारी शाहीर

**योगेश कुदळे** । मुंबई
९३७०७९९७९१

इंजिनियर होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेला एक तरुण नक्षलवादी चळवळीत जातो. तोच तरुण कालांतराने नक्षलवाद सोडून गावोगावी जाऊन गाणी म्हणतो, नृत्य करतो आणि लोकांचे प्रबोधन करतो. अगदी एखाद्या सिनेमाचे कथानक शोभावे असे आयुष्य जगलेला आणि आयुष्यभर आख्यायिका बनून राहिलेला क्रांतिकारक लोकशाहीर गदर, असा अचानक आपल्यातून जाईल असं वाटलं नव्हतं. त्याचं कारणही तसंच आहे. खरं तर, प्रबोधन करणाऱ्या लोकांचे विचार पटत नाहीत म्हणून त्यांना ठार मारण्याची परंपरा तशी नवी नाही. गदरही त्यातून सुटले नाहीत. १९९७ साली गदर यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्या हल्ल्यामध्ये त्यांच्यावर पाच गोळ्या झाडल्या गेल्या होत्या. पैकी चार गोळ्या काढण्यात डॉक्टरांना यश आले. परंतु एक गोळी मात्र त्यांच्या मणक्यात अगदी मरेपर्यंत होती; ती त्यांच्यावर अज्ञात बंदूकधाऱ्यांनी केलेल्या अयशस्वी हत्येची आठवण म्हणून. त्या हल्ल्यातून बचावलेले गदर मागील महिन्यात हृदयाच्या विकाराने गेले, अगदी अचानक.

तेलंगणातील मेडक जिल्ह्यातील एका गरीब, दलित कुटुंबात गुम्मडी विठ्ठल राव म्हणून जन्मलेले गदर कठीण परिस्थितीत मोठे झाले. गदर यांच्या वडिलांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव होता. ते बाबासाहेबांना भेटले देखील होते. बाबासाहेबांच्या प्रभावाखाली आलेल्या त्यांच्या वडिलांनी त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले, ज्यामुळे एक गायक आणि क्रांतिकारक कवी असलेला एक विद्यार्थी म्हणून हैदराबादमधील अभियांत्रिकी महाविद्यालयात दाखल झाला. जातीने दलित असणाऱ्या गुम्मडी विठ्ठल राव यांना आरक्षणामुळे अभियांत्रिकी कॉलेजात प्रवेश मिळाला खरा; परंतु, तेथील विद्यार्थी त्यांना 'तू काय सरकारचा जावई!' म्हणून चिडवू लागले. आपल्याला इतरांकडून हिणकस वागणूक मिळते, आपल्यावर होणारा अन्याय कमी होत नाही, याची प्रचिती त्यांना सतत मिळत होती. शिक्षण घेत असताना त्यांना जे कटू अनुभव आले, त्यांनी ते व्यथित झाले आणि ते नक्षलबारी चळवळीच्या क्रांतिकारी विचारसरणीकडे आकर्षित झाले आणि त्या चळवळीचा भाग बनले. ते जरी नक्षलवादी चळवळीचा घटक बनले असले, तरी ते मुळात कवी आणि गायक असल्याने, नक्षलवादी चळवळीत देखील ते सांस्कृतिक विभाग पाहायचे. ते एका गाण्यात म्हणतात,

'भारत अपनी महान भूमी,
इसकी कहाणी सुनो रे भाई,
सर पे खडा बडा हिमालय,
नदियाँ बहती गंगा, जमुना,
ब्रह्मपुत्र, गोदावरी, कृष्णा,
खडा जंगल पहाड अपना,
हरीभरी अपनी धरती में,
निकले मोती, उगे सोना,
सुजलाम् सुफलाम् इस देश में,
रोटी महंगी क्यों रे भाई ?'

आपल्या देशात प्रश्न विचारणाऱ्यांची एक मोठी परंपरा आहे. गदरही या गाण्यातून व्यवस्थेला प्रश्न विचारतात की, 'सुजलाम् सुफलाम् असणाऱ्या आपल्या राष्ट्रात, भाकरी एवढी महाग का आहे?' या प्रश्नाचे उत्तर त्यांनी या गाण्यातून सांगण्याचा प्रयत्न केला.



गदर यांच्या तेलंगणाला एक इतिहास आहे. हा निजामाच्या हैदराबाद संस्थानाचा एक भाग होता ज्याने स्वातंत्र्यानंतर भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार दिला होता. जमीनदार आणि जहागिरदार

त्यांच्यामार्फत दलित, आदिवासी आणि गरीबांच्या जमिनी बळकावल्या; आणि त्यांच्यावर अत्याचार करण्यासाठी रझाकार या स्वेच्छा निमलष्करी दलाचा वापर केला आणि त्यांना बिनपगारी मजूर (bonded labours) होण्यास भाग पाडले. या दडपशाही विरोधात कम्युनिस्टांच्या पाठिंब्याने १९४६-४८ साली तेलंगणामध्ये सशस्त्र उठाव झाला. तथापि, १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर सरकारमध्ये सामील झाल्यानंतरही सामंतांनी अत्याचार आणि शोषण चालूच ठेवले. भलेही कम्युनिस्टांनी दडपशाहीविरुद्धच्या लढ्याचे नेतृत्व केले असले, तरी त्याचे नेतृत्व प्रामुख्याने उच्चवर्णीयांकडेच होते. त्यातच १९५६ मध्ये हैदराबाद राज्याचे संयुक्त तेलुगू भाषकांचे आंध्र प्रदेशात विलीनीकरण झाल्यामुळे तेलंगणा प्रदेशातील परिस्थिती आणखी बिघडली. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात तेलंगणामधील या संघर्षाने समतांकडून होणाऱ्या आदिवासींवरील जाती-आधारित अत्याचाराविरुद्ध नक्षलवादी चळवळीकडे लोकांना आकर्षित केले. तेलंगणातील या दडपशाहीच्या काळातच गदर यांनी १९७२ मध्ये, जननाट्य मंडळी या सांस्कृतिक संघटनेची स्थापना केली होती, जी पुढे जाऊन CPIML-पीपल्स वॉरची सांस्कृतिक शाखा बनली आणि जी नंतर CPI-माओवादी या पक्ष संघटनेत विलीन झाली.

जननाट्य मंडळीने, नाट्य आणि गीत यांचा वापर करून लोकप्रबोधन केले. त्यांनी ही चळवळ लोकांपर्यंत पोचवण्यासाठी स्थानिक भाषा आणि गाणी वापरली. तसेच त्यांनी स्थानिक लोककलेला 'बुर्रा कथा' या मौखिक कथा सांगण्याच्या तंत्राशी जोडले. एका मुलाखतीमध्ये गदर यांना एक प्रश्न विचारण्यात आला होता की, 'तुम्हाला वाटतं का, की तुमच्या गाण्यातून परिवर्तन घडेल म्हणून?' या प्रश्नाचं उत्तर देताना ते म्हणतात, 'बंदुकीच्या जोरावर चालणारी चळवळ काही सेकंदांची असते. ती लगेच संपते, त्याचा परिणाम काहीच होत नाही. परंतु लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करून त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे असते, जे गाणंच करू शकेल. या देशातील सांस्कृतिक संघर्ष हा एक दीर्घकालीन लढा आहे. जे समतेचे स्वप्न इथल्या शहिदांनी, समाजसुधारकांनी, प्रबोधकांनी पाहिलं होतं, ते सत्यात उतरवण्यासाठी गाणं हेच एक माध्यम आहे. गाणीच लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणतील.'

खरं तर, गदर यांचा पिंड गायकाचा आणि त्याचबरोबर गाणी रचण्याचा होता. जेव्हा ते नक्षलवादी चळवळीमध्ये सांस्कृतिक विभागाचे संघटक म्हणून काम करत होते तेव्हा ते बत्तीस भाषा शिकले. जवळपास सर्व भाषांमधून त्यांनी गाणी रचली. परंतु तेलुगूमधून त्यांनी हजारोंच्यावर गाणी लिहिली, ज्यामुळे ते लोकांच्या गळ्यातील ताईत बनले. लोक त्यांना गदर अण्णा म्हणायचे. अण्णा म्हणजे मोठा भाऊ. गदर यांच्या कामगिरीने हजारो लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. त्यांच्या सांस्कृतिक चळवळीचा भाग बनले. लोकांनी त्यांना 'प्रजा गायकुडू' म्हणजेच 'जन गायक' ही उपाधी दिली.

पांढरीशुभ्र दाढी आणि वाढलेले केस, असा गदर यांचा पोशाख मेंढपाळाच्या कपड्याची आठवण करून देणारा होता. नुसतं धोतर नेसलेलं आणि खांद्यावर लोकरीची काळी घोंगडी घेतलेले, उघड्या छातीचे गदर, तेलंगणा राज्याच्या चळवळीचा सर्वात प्रसिद्ध सामाजिक-सांस्कृतिक चेहरा होता. त्यांच्या हातात काठी होती आणि मनगटावर लाल रुमाल बांधलेला असायचा. गुम्मडी विठ्ठल राव म्हणून जन्मलेला, कधी अभियंता होण्याचं स्वप्न बाळगलेला हा माणूस क्रांतिकारक झाला होता. त्यांनी आता गदर नाव धारण केलं होतं, जे पंजाबमधील ब्रिटिश वसाहतवादी राजवटीला विरोध करणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व गदर पक्षाला श्रद्धांजली म्हणून स्वीकारलं होतं आणि ते आता गाणी गात लोकांचं संघटन उभं करत होते.

'चलो रे चलो साथी
एक साथ आयेंगे
संघटन बनायेंगे
चलो रे चलो साथी
जब रोड हम बनाया
तो गाडी उनकी चलती
जब चाबी हम बनाये
तिजोरी उनकी खुलती
वो बने मालामाल
अपने हाल बेहाल है
चलो रे चलो साथी'

गदर त्यांच्या गीतांना मूर्त रूप देत गेले. त्यांनी लोकांशी त्यांना समजतील अशा बोलीभाषेत गाणी गायली. ती गाणी दीनदुबळ्यांच्या जीवनाबद्दलची होती. गदर यांनी या गाण्यांतून या साऱ्यांना बहिष्कृतांचा आवाज म्हणून एकत्रित केलेः जे लोकांच्या न ऐकलेल्या कथा सांगू शकतात. तीन दशकांपासून संगीत आणि गदर यांचे अतूट नाते होते. त्याचा प्रभाव त्यांच्या प्रदेशाच्या पलीकडे पसरला.

बी.नरसिंह राव या रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने गदर यांना त्यांच्यामध्ये सामील होण्यासाठी राजी केले. त्यांची अनोखी शैली, संदेश आणि संगीत आणि गीतलेखनाचा दृष्टिकोन; तसेच कवी, गायक म्हणून त्यांनी तेलुगु चित्रपट क्षेत्रातील कलाकारांवर प्रभाव टाकला. त्यांनी चित्रपटांसाठी गाणी लिहिली आणि ती खळबळजनक ठरली. त्यांची प्रतिभा आणि त्यांच्या कामगिरीचे सामर्थ्य पाहून राव यांनी १९७९ मध्ये १९४८च्या तेलंगणा सशस्त्र उठवावर आधारित तेलुगु चित्रपट 'मा भूमी' द्वारे गदरची रूपेरी पडद्यावर ओळख करून दिली. त्यांचे 'बंदेन का बंदि कट्टी' हे गाणे हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. गदर यांची गाणी संकलित करून पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित करण्यात आली. १९८० आणि १९९०च्या दशकात त्याच्या ऑडिओ कॅसेट बेस्ट सेलर ठरल्या होत्या. 'जय बोलो तेलंगणा' (२०११) चित्रपटात गदर यांनी स्वतःची भूमिका केली आणि दोन गाणी गायली, ज्यांची लोकांकडून प्रशंसा झाली. त्यांना नंदी पुरस्कारही मिळाला. प्रदीर्घ संघर्षानंतर २०१४ मध्ये तेलंगणाची निर्मिती झाली. २०१४ मध्ये तेलंगणा आंदोलन यशस्वी होण्यापूर्वी या कवी-गायकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांचे 'पोदुस्तुन्ना पोड्डू मीडा नादुस्तुन्ना काळमा पोरू तेलंगनामा' हे गाणे प्रचंड यशस्वी झाले आणि लोकांना आंदोलनाकडे आकर्षित केले. तेलंगणा राज्याच्या चळवळीत गदर यांच्या क्रांतिकारी गीतांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९९६ मध्ये त्यांनी 'अम्मा तेलंगनामा, अकाली केकाला गानामा' या चळवळीवरील पहिले गाणे सादर केले. २०१० पर्यंत ते भूमिगत चळवळीत सक्रिय राहिले. त्यांनी स्वतंत्र तेलंगणा राज्यासाठी तेलंगणा प्रजा आघाडीची स्थापना केली. फेब्रुवारी १९९० मध्ये, गदर सार्वजनिक जीवनात परतले. तेलुगूमध्ये या आंदोलनाचे 'प्रजा युद्ध नौका' (लोकांच्या आंदोलनांचे युद्ध जहाज) असे अनेकदा वर्णन केले जाते. १९९०च्या दशकात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या तेव्हा ते त्यांच्या जीवावर बेतले होते. तेव्हा त्यांच्या पाठीच्या कण्यामध्ये एक गोळी कायमची अडकली. जे गदर सहसा त्यांच्या ट्रेडमार्क धोतरात, लाल शाल आणि लाकडी काठी घेऊन दिसत होते, ते अलीकडच्या वर्षांत ट्राऊझर्स आणि शर्टमध्ये आणि क्लीन शेव्ह लूकमध्ये दिसू लागले होते.

२०१७ मध्ये त्यांनी पक्ष सोडला आणि संविधानावर आपला विश्वास आहे हे जाहीर केले. त्यांनी पंचशील ध्वज हाती घेतला आणि आपण आंबेडकरवादी असल्याचे जाहीर केले. तसेच इथून पुढील काळात मरेपर्यंत बौद्ध आदर्शांनुसार काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गदर यांचे लोकशाही मार्गावर परतणे त्यांना राजकीय पक्षांच्याजवळ घेऊन गेले. २०१८ मध्ये त्यांचा मुलगा काँग्रेसमध्ये दाखल झाला असला तरी त्यांनी पक्षाचे निमंत्रण नाकारले. त्यांच्यासारख्या क्रांतिकारी कलावंतासाठी राजकारण त्यांच्या गीतात्मक कवितेत बसत नव्हते.


गेल्या वर्षी मतदार म्हणून नोंदणी करून त्यांनी औपचारिकपणे माओवाद्यांशी संबंध सोडला, बुद्धविहारांना भेटी देण्यास सुरुवात केली आणि स्वतःला आंबेडकरवादी घोषित केले. अगदी काही महिन्यांपूर्वी त्यांची आणि सोनिया गांधी तसेच राहुल गांधी यांची भेट झाली होती. ६९ वर्षीय सोनियांना भेटल्यानंतर त्यांनी टेलिग्राफला सांगितले की, मी कोणत्याही पक्षाचा प्रचार करत नाही, पण क्रांतिकारी चळवळ आणि लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष पक्ष यांच्यातील सेतू बनून कायम राहीन. 'बुर्झवा' काँग्रेसशी लढा देण्यापासून ते तेलगू देसम पार्टी, सीपीआय आणि तेलंगणा जन समिती यांच्याशी युती करण्यास समर्थन देण्याबद्दल विचारले असता, त्यांनी कबूल केले, 'मी संसदीय लोकशाहीला विरोध केला. कारण पैसा, मीडिया आणि माफिया मुख्य भूमिका बजावत होते.' ते पुढे म्हणाले, ''मी संविधान वाचवण्यासाठी या चळवळीत सामील होत आहे. लोकांना कट्टरपंथीयांच्या ताब्यात देश द्यायचा नाही. किमान काँग्रेसमध्ये तरी अंतर्गत लोकशाही आहे आणि तो कट्टरतावादी पक्ष नाही. संविधान वाचवण्यासाठी आम्ही चळवळ उभारू. मी तेलंगणात सुरुवात करेन आणि नंतर


**(पृष्ठ क्रमांक २९ वर पहा)**




# ॲटोसेकंद : भौतिकशास्त्र ज्ञानशाखेचा सन्मान

**डॉ. विजय कुंभार, डॉ. केशव राजपुरे** । कोल्हापूर
९६०४२५०००६




सन २०२३ सालचे भौतिकशास्त्र विषयातील नोबेल पारितोषिक पीएरे अगोस्टिनी, फेरेन्क क्रूज आणि ॲनल'हुलियर या तीन शास्त्रज्ञांना जाहीर झाले आहे. त्यांनी इन्फ्रारेड (अवरक्त) लेसर किरणांचा वापर करून प्रकाशाचे ॲटोसेकंद स्पंद निर्माण करण्याची पद्धत विकसित केली आहे. या पद्धतीचा वापर करून इलेक्ट्रॉनच्या सूक्ष्म हालचालींचा अभ्यास करणे आता शक्य झाले आहे. त्यांच्या या यशामुळे आता विज्ञानातील नवीन कवाडे उघडली जाणार आहेत.

या वर्षाच्या शोधाची पूर्वपीठिका जवळपास शंभर वर्षांपूर्वीच्या संशोधनाशी जोडली आहेत. हायजनबर्गच्या अनिश्चिततेच्या तत्त्वानुसार इलेक्ट्रॉनचे स्थान आणि संवेग एकाच वेळी विशिष्ट मर्यादेपलीकडे ठरवणे अशक्यप्राय आहे. कारण स्थान अचूकपणे निश्चित करत असताना संवेगाच्या मोजमापामध्ये अनिश्चितता वाढते आणि तसाच अनुभव संवेगाच्या अचूक मोजमापादरम्यान येतो. आत्ताच्या या शोधामुळे स्थान आणि संवेग अगदी अचूकपणे निश्चित करणे शक्य होणार नसले तरी त्यांच्यातील अनिश्चितता कमी करणे मात्र शक्य झाले आहे असे वाटते.

इलेक्ट्रॉनची स्थिती आणि संवेग एकाच वेळी मोजणे फार महत्त्वाचे असते. कारण एकतर दृश्य प्रकाशाच्या साहाय्याने असे सूक्ष्म कण पाहता येत नाहीत पण मोजमापातून ही माहिती अवगत झाल्यास ते असलेल्या पदार्थांचे विविध गुणधर्म अभ्यासून त्यांचे वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट मधील उपयोग अधिक कार्यक्षमतेने आणि स्वस्तात करणे शक्य होऊ शकते. तसेच अणू आणि केंद्रकाबद्दलच्या धारणावादीच्या प्रस्तावित सिद्धांताचा तो पुरावा असू शकतो.

या वर्षातील नोबेल विजेत्यांनी काय साध्य केले याची ढोबळ कल्पना यावी यासाठी आपण दैनंदिन व्यवहारातील एक उदाहरण घेऊया. समजा तुम्ही एखाद्या रेल्वे फलाटावर उभे आहात व समोरून अतिवेगाने रेल्वेगाडी जाते आहे. अशा स्थितीमध्ये तुम्ही कॅमेऱ्याच्या साह्याने त्या रेल्वेचे छायाचित्र घेतले तर ते अस्पष्ट किंवा धूसर मिळते. याउलट फलाटावर थांबलेल्या रेल्वेची प्रतिमा अगदी स्पष्टपणे टिपता येते. असे का? याचे स्पष्टीकरण कॅमेरॅच्या झडपवेग किंवा प्रभावन कालामध्ये लपलेले आहे. जर प्रभावन काल जास्त असेल किंवा झडपवेग कमी असेल तर तो कॅमेरा धावणाऱ्या रेल्वेची प्रतिमा अस्पष्टपणे टिपतो. त्यामुळे धावत्या रेल्वेचे चित्र स्पष्ट येण्यासाठी प्रभावन काल इतका कमी करावा (किंवा झडपवेग इतका वाढवावा) की धावणारी रेल्वे कॅमेऱ्याला स्थिर वाटेल.

अणूंमधील इलेक्ट्रॉन्सचे निरीक्षण करण्यासाठी असाच प्रयोग केला जाऊ शकतो का असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. परंतु हे करताना आपल्याला इलेक्ट्रॉनची हालचाल गती आणि कॅमेऱ्याचा झडपवेग जुळवणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉन किती गतिमान आहे

हे समजण्यासाठी खाली दिलेले आकडे पुरेशे आहेत. खोलीच्या एका टोकापासून विरुद्ध भिंतीवर प्रकाशाची चमक जाण्यासाठी दहा अब्ज अ‍ॅटोसेकंद लागतात. अ‍ॅटो म्हणजे १ भागिले १ वर १८ शून्य. अणुकेंद्रकाभोवती फिरणाऱ्या इलेक्ट्रॉनचा वेग खूप जास्त असतो. इलेक्ट्रॉनला केंद्रकाभोवती एक आवर्तन पूर्ण करण्यासाठी सुमारे २४ अ‍ॅटोसेकंद लागतात. प्रकाशाला अणूच्या व्यासाएवढे अंतर कापण्यासाठी अंदाजे एक अ‍ॅटोसेकंद इतका वेळ लागतो. त्यामुळे गतिशील कण आणि चित्रण यंत्रणा यांचा वेग समान असल्याशिवाय कणाच्या गतिशीलतेला चित्रित करता येणार नाही.

इलेक्ट्रॉनची काल निहाय उत्क्रांती मोजण्यासाठी, नियंत्रित प्रणाली वापरणे आवश्यक होते ज्याचा कालावधी त्या गतिशीलतेशी संवाद साधू शकेल. हेच कारण आहे की काही–फेमटोसेकंद आणि अ‍ॅटोसेकंद काल–अधिक्षेत्रामधील अतिउच्च वेगवान घटनांचा अभ्यास करण्यासाठी अ‍ॅटोसेकंद प्रकाश स्पंदांचा (पल्स) वापर केला जातो.

एक फेमटोसेकंद कालावधीच्या एकचक्र प्रकाशीय स्पंदाचा (सिंगल ऑप्टिकल पल्स) वापर करून पदार्थांमधील इलेक्ट्रॉनच्या गतिशीलतेचा अभ्यास करणे शक्य नाही. कोणतीही लेझर प्रयोगशाळा आतापर्यंत कमीत कमी सहा फेमटोसेकंद इतका अवधी असलेले प्रकाश स्पंद मिळवू शकली होती. खरं तर, १९९९ सालच्या रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्या झियाउद्दीन अहमद यांना फेमटोसेकंद स्पंदचा वापर करून रेणूमधील अणूंची हालचाल तसेच रासायनिक आंतराभिक्रियाची माहिती मिळवणे शक्य झाले होते. परंतु इलेक्ट्रॉनच्या गतिशीलतेचा अभ्यास करण्यासाठी, एक फेमटोसेकंदचा प्रकाश स्पंद साध्य करणे आवश्यक होते.

त्याच अनुषंगाने प्रकाशाची अ‍ॅटोसेकंद स्पंद निर्माण करण्यासाठीचा पहिला प्रयोग हा पॅरिस येथील सॅकले विद्यापीठातील एम फेरे यांच्या संशोधन प्रयोगशाळेत केला गेला. यावर्षीच्या नोबेल पारितोषिक विजेत्या अ‍ॅन लहूल्लिअर यांचाही त्यामध्ये सहभाग होता. त्यांनी १०६४ नॅनोमीटर तरंगलांबी (३.५ फेमटोसेकंद, आवर्त) असलेल्या अवरक्त किरणांच्या शक्तिशाली लेझर प्रकाशाचा निष्क्रिय वायूवर मारा केला. त्यात त्यांना आश्चर्यकारक निरीक्षणे मिळाली. निष्क्रिय वायूमधून बाहेर पडणारा प्रकाशीय वर्णपट उच्च संवादिक निर्मिती (एचएचजी अर्थात हाय हार्मोनिक जनरेशन) चा होता. त्याचबरोबर मिळालेले प्रकाश स्पंद प्रारण अतिशय संसंजीत (कोहरंट) होते.

एचएचजी म्हणजे काय ते थोडक्यात समजावून घेऊया. गणितीय समीकरणांवर आधारित एकापेक्षा जास्त तरंग वापरून, तुम्ही तुम्हाला हवे असलेले कोणतेही तरंगलांबीचे तरंग तयार करू शकता. लहान तरंगलांबीच्या अनेक तरंग एकत्र करून प्रकाशाची अ‍ॅटोसेकंद स्पंद मिळविणे शक्य आहे. जेव्हा लेझर स्पंद निष्क्रिय वायूवर आदळते तेव्हा अधिस्वरक (ओव्हरटोन) तयार होतात. अधिस्वरक म्हणजे मूळ लहरीमध्ये एकापेक्षा जास्त तरंग निर्माण करणाऱ्या लाटा. याची तुलना गिटारमध्ये तयार झालेल्या अधिस्वरकशी करता येईल. सर्वात खालच्या वारंवारितेपेक्षा गुणित वारंवारिता असलेल्या सर्व लहरींना ओव्हरटोन म्हणतात. ओव्हरटोन आवाजाला त्याचे विशिष्ट वर्ण देतात, यामुळेच आपणास गिटार आणि पियानोवर वाजवलेल्या समान नोटमधील फरक ऐकून कळतात. 'ओव्हरटोन' ही संज्ञा सामान्यत: कोणत्याही उच्च–वारंवारिता असलेल्या स्थिर तरंगास लागू केली जाते, तर 'हार्मोनिक' हा शब्द जिथे ओव्हरटोनची वारंवारता मूलभूत वारंवारतेचा अविभाज्य गुणाकार असतो तिथे वापरावा लागतो.

एका तरंगात नवीन तरंग जोडण्यासाठी केवळ वेगवेगळे लेझर असून चालत नाही, तर लेझर प्रकाश वायूमधून घालवणे ही झटपट लघु स्पंदांची निर्मिती करण्याची गुरुकिल्ली आहे. प्रकाशाची वायूच्या अणूंशी आंतरक्रिया अधिस्वरक अर्थात ओव्हरटोन तयार करते.

जेव्हा लेझर प्रकाश वायूमध्ये प्रवेश करतो तेव्हा त्याच्या अणूंशी क्रिया करतो. त्यामुळे अणूमध्ये विद्युत चुंबकीय कंपने तयार होतात जी इलेक्ट्रॉनच्या विद्युत क्षेत्रात व्यत्यय आणण्यास कारणीभूत ठरतात. त्यानंतर इलेक्ट्रॉन अणूंमधून बाहेर पडू शकतात. तथापि, लेझर प्रकाशाचे सतत कंपित असलेले विद्युत क्षेत्र जेव्हा दिशा बदलते तेव्हा एखादा सैल इलेक्ट्रॉन त्याच्या अणूच्या केंद्रकाकडे आकर्षित होऊ शकतो. इलेक्ट्रॉनच्या या सफरी दरम्यान, लेसर प्रकाशाच्या विद्युत क्षेत्रातून बरीच

अतिरिक्त ऊर्जा संकलित करू शकतो आणि केंद्रकाशी पुन्हा जोडताना तो प्रकाशाच्या अल्प कालावधीच्या स्पंदाद्वारे त्याची अतिरिक्त ऊर्जा सोडू शकतो. इलेक्ट्रॉन उत्सर्जित केलेल्या या प्रकाशस्पंद प्रयोगांमध्ये दिसणारे ओव्हरटोन तयार करतात.

एकदा हे ओव्हरटोन अस्तित्वात आले की, ते एकमेकांशी संवाद साधतात. येथे ओव्हरटोन लहरी व्यतिकरण (इंटरफेरेन्स) पावतात. व्यतिकरण तेव्हा होते जेव्हा दोन किंवा अधिक लहरी एकत्र येऊन पहिल्यापेक्षा मोठी किंवा लहान लहरी मिळते. जेव्हा दोन लहरींची शिखरे जुळतात तेव्हा प्रकाश अधिक तीव्र होतो, परंतु जेव्हा एका लहरीतील शिखर दुसऱ्या लहरीतील दरीशी जुळते तेव्हा प्रकाश कमी तीव्र होतो. योग्य परिस्थितीत, ओव्हरटोन्स एकरूप होतात ज्यामुळे अतिनील प्रकाशाच्या स्पंदांची माला तयार होते. प्रत्येक स्पंद काही ॲटोसेकंद रुंद असते. १९९० च्या दशकात भौतिकशास्त्रज्ञांना यामागील सिद्धांत समजला, परंतु २००१ मध्ये प्रत्यक्षात स्पंद ओळखणे आणि त्यांची चाचणी करण्याचा शोध लागला.

पूर्वीपेक्षा कमी कालावधीचे स्पंद उपलब्ध झाल्याने बऱ्याच गोष्टींचा उलगडा करणे शक्य झाले आहे. १९०५ साली अल्बर्ट आइनस्टाइन यांनी फोटोइलेक्ट्रिक इफेक्टचे स्पष्टीकरण प्रकाशित केले होते. परंतु तेव्हा या प्रभावासाठी आवश्यक कालश्रेणींचे निराकरण करणे अशक्य होते. हा प्रभाव तत्क्षणी असतो असे बऱ्याच काळचे वास्तव होते. परंतु या वर्षीच्या नोबेल विजेत्यांनी फोटोइलेक्ट्रिक प्रभावाची कालश्रेणी काय असू शकते हे अन्वेषित केले.

जेव्हा अणूमधील एखादा इलेक्ट्रॉन प्रकाश ऊर्जा शोषून घेतो, शोषलेली ऊर्जा इलेक्ट्रॉनची बंधन ऊर्जा आणि प्रकाशकणांची ऊर्जा यांच्यातील फरकाएवढ्या गतिज ऊर्जेसह उत्सर्जित होते. अणू फोटो उत्सर्जनाच्या जटिल गतिशीलतेमुळे थोडा विलंब होतो. पण किती काळ विलंब हा प्रश्न निर्माण होतो. तो विलंब ॲटोसेकंद कालश्रेणींमधील असू शकतो का? यावर विचार सुरु झाला.

क्रॉझ यांच्या संशोधन समूहाला एका आद्यप्रयोगात असे आढळून आले की, जेव्हा निऑन वायूचा अणू १००शत प्रकाशकणांनी आयनीकृत केला जातो, तेव्हा २-एस आणि २-पी इलेक्ट्रॉन एकाच वेळी ऊर्जा उत्सर्जित करत नाहीत. २-पी इलेक्ट्रॉन २-एस इलेक्ट्रॉन पेक्षा एकवीस ॲटोसेकंदने उशीरा उत्सर्जित होतो. हा उत्सर्जन विलंब इलेक्ट्रॉन ढगांच्या सामूहिक गतिशीलतेचे लक्षण आहे. क्रॉझ ग्रुपने अतिउच्च अतिनील आणि अवरक्त स्पंदांमधील वेळेच्या प्रतिरूपमुद्रणच्या कार्यासाठी इलेक्ट्रॉनची गतिज ऊर्जा मोजण्याचे पृथक ॲटोसेकंद स्पंद आणि रेखांकन तंत्र वापरले.

१९८७ मध्ये, ॲन ल'ह्युलियर आणि तिच्या सहकाऱ्यांनी फ्रेंच प्रयोगशाळेत एका निष्क्रिय वायू मधून इन्फ्रारेड (अवरक्त) लेसर किरणांना पार केल्यास ओव्हरटोन तयार होतात हे दाखवून दिले. अगोदरच्या प्रयोगांमध्ये वापरल्या गेलेल्या लघु तरंगलांबी असलेल्या लेझरपेक्षा इन्फ्रारेड किरण संख्येने जादा आणि बलवत्तर ओव्हरटोन देतात असे दिसून आले. यापैकी काही सुरुवातीचे आणि वरचे क्रमाकांचे ओव्हरटोन वगळता मधले ओव्हरटोन समान तीव्रतेचे मिळाले होते. अनेक प्रयोगांनंतर, १०६४ नॅनोमीटर तरंगलांबीचा अवरक्त लेसर प्रकाश समतल पठार प्राप्त करण्यासाठी निश्चित करण्यात आला.


पुंजयामिकीच्या सिद्धांतानुसार निर्माण करण्यात आलेल्या ॲटोसेकंद स्पंदाचा कालावधी मोजण्यासाठी आधुनिक उपकरण तयार करणे आवश्यक होते. अगोस्तिनी आणि त्यांच्या गटाने 'फ्रिक्वेन्सी मॉड्युलेशन इन टू कलर फोटॉन फिल्ड' या तत्त्वाचा वापर करून रॅबिट (रिकंस्ट्रक्शन ऑफ ॲटोसेकंड बीटिंग बाय इंटर्फरन्स ऑफ टू फोटॉन ट्रान्सिशन) तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा कालावधी मोजला. रॅबिट तंत्रज्ञानात उच्च अतिनील स्पंद आणि मूळ लेझरमधील प्रकाश एकाचवेळी निष्क्रिय वायूवर केंद्रित केला आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या फोटोइलेक्ट्रॉनचे विश्लेषण करून ॲटोसेकंद स्पंदांच्या ट्रेनचा स्पंद कालावधी मोजला. दोन फोटॉनच्या संक्रमणातील लहरींचे व्यतिकरण झाल्यानंतर ॲटोसेकंद स्पंदाची पुनर्बांधणी होत लयन होते.

पियरे अगोस्टिनी आणि फ्रान्समधील त्यांच्या संशोधन गटाने मालगाडी असलेल्या रेल्वेप्रमाणे सलग प्रकाश स्पंदांची माला तयार करण्यात आणि तपासण्यात

यश मिळविले. ओव्हरटोन्स एकमेकांच्या समकलेत कसे आहेत हे पाहण्यासाठी त्यांनी मूळ लेझर स्पंदाच्या विलंबित भागासह ‘पल्स ट्रेन’ एकत्र ठेवण्याची विशेष युक्ती वापरली. या प्रक्रियेमुळे त्यांना ट्रेनमधील स्पंदांच्या कालावधीचे मोजमाप करणे देखील शक्य झाले आणि प्रत्येक स्पंद फक्त २५० ॲटोसेकंद टिकते असे त्यांना आढळून आले.

त्याच वेळी, ऑस्ट्रियातील फेरेंक क्रॉझ आणि त्यांचा संशोधन गट पल्सट्रेन मधील फक्त एकच स्पंद निवडण्याच्या एका तंत्रावर काम करत होते. त्यांना ६५० ॲटोसेकंद स्पंद वेगळे करण्यात यश आले. इलेक्ट्रॉन अणूंपासून दूर खेचण्याच्या प्रक्रियेचा मागोवा तसेच अभ्यास करण्यासाठी त्यांनी या स्पंदनांचा वापर केला.

लुंडचा प्रयोग आणि बहुकणीय प्रक्षोभ सिद्धांताने केलेली सैद्धांतिक गणना यांच्यातील एकमतता असे सूचित करते की, क्रॉझ गटाच्या मूळ निरीक्षणावर शेक-अपचा (इतर इलेक्ट्रॉन संक्रमणाचा) परिणाम झाला होता. २-पी इलेक्ट्रॉन काढून टाकण्यासाठी एका फोटॉनला लागणारी ऊर्जा आणि त्याच वेळी दुसऱ्या २-पी इलेक्ट्रॉनला ३-पी ऊर्जा पातळीमध्ये प्रचालन करताना लागणारी ऊर्जा यातील फरक २-एस इलेक्ट्रॉनच्या थेट आयनीकरणासाठी लागणाऱ्या उर्जेपेक्षा फक्त ७.४ शत जास्त असते. दोन भिन्न प्रक्रियांसाठीच्या या किरकोळ ऊर्जा फरकामुळे मूळ प्रक्रिया ओळखण्यात दिशाभूल




होऊ शकते. लुंड प्रयोगात, पार्श्वपट्ट शेक-अप संकेत आणि २-एस पासूनचे संकेत स्पष्टपणे पारखता येऊ शकले. अशाप्रकारे संशोधक कालबद्ध आणि वर्णक्रमीय विभेदनामधील आदलाबदल ओळखू शकले.

**इलेक्ट्रॉनच्या हालचाली सुलभ शक्य झाल्या आहेत**

ॲटोसेकंद स्पंदांमुळे इलेक्ट्रॉनला अणूपासून दूर नेण्यासाठी लागणारा वेळ मोजणे शक्य होते आणि अणूच्या केंद्रकाला इलेक्ट्रॉन किती घट्ट बांधला जातो यावर किती वेळ लागतो हे तपासणे शक्य झाले आहे. रेणू आणि पदार्थांमध्ये इलेक्ट्रॉन्सचे वितरण एका बाजूने दुसऱ्या बाजूला किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कसे बदलते याचे पुनर्निर्माण करणे शक्य झाले आहे; पूर्वी इलेक्ट्रॉनचे स्थान केवळ सरासरी म्हणून मोजणे शक्य असायचे.

ॲटोसेकंद स्पंदांचा उपयोग पदार्थाच्या अंतर्गत प्रक्रिया तपासण्यासाठी आणि विविध घटना ओळखण्यासाठी केला जाऊ शकतो. या स्पंदांचा वापर अणू आणि रेणूंच्या तपशीलवार भौतिकशास्त्राचे परिज्ञापन करण्यासाठी केला गेला आहे आणि इलेक्ट्रॉनिक्सपासून औषधापर्यंतच्या सर्वच क्षेत्रात त्यांचा संभाव्य उपयोग दिसून येतो.

उदाहरणार्थ, ॲटोसेकंद स्पंदांचा वापर मोजता येण्याजोगे संकेत उत्सर्जित करणाऱ्या रेणूंना ढकलण्यासाठी केला जाऊ शकतो. रेणूंच्या संकेतामध्ये एक वैशिष्ट्यपूर्ण खूण असते ज्याद्वारे त्या रेणूला ओळखता येते. त्यामुळे या शोधाच्या महत्वाच्या संभाव्य उपयोगांमध्ये रोगनिदान आणि उपचार आदींचा समावेश असेल.

**(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख असून जगातील शीर्ष २% शास्त्रज्ञांच्या यादीत त्यांचा समावेश होतो. सदरचा लेख** https://rajpure.blogspot.com **ब्लॉग वरून साभार)**

●

**आवाहन**

**चमत्कार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २५ लाख रुपयांचे आव्हान समितीने दिले आहे. चमत्काराचा दावा करणाऱ्या व्यक्तींना समितीची आव्हान प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.**

**संपर्क : ९४०४८७०४३५**



# बुवाबाजीचा स्पर्धा परिक्षार्थींमध्ये प्रवेश

**विशाल विमल ।** पुणे
७२७६५५९३१८

पुण्यासारख्या शहरात उच्चशिक्षित असलेली तरुण महिला बुवाबाजी करून लोकांना फसवते ही धक्कादायक गोष्ट आहेच, पण त्यातून अधिक चिंताजनक गोष्ट ही आहे की, उच्च शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करणारी तरुणाई यश मिळावे, मनोबल वाढावे म्हणून या भोंदू महिलेच्या चरणी लीन होत आहे. पारंपारिक पद्धतीने फसवणूक करणारी बुवाबाजी काळाच्या ओघात पडद्याआड जात असताना फसवणुकीचे नवनवीन प्रकार समोर आले आहेत, पण हेही अर्धसत्य आहे. शहराच्या उच्चभ्रू भागामध्ये आधुनिकतेचा साज घेऊन कन्सल्टन्सी ऑफिसच्या नावाखाली भोंदू महिला बुवाबाजीचे दुकान थाटते, तर दुसऱ्या बाजूला पारंपरिक पद्धतीने ही महिला स्वतःकडे येणाऱ्या भक्तांना राख खायला देते, हातात गंडे, दोरे बांधते, पाय धुतलेले पाणी प्यायला लावते आणि भक्त ते अत्यंत निष्ठेने अथवा भीतीने हे सगळे प्रकार करतात. एका बाजूला उच्चशिक्षित तरुणाई, गर्भश्रीमंत लोक तर दुसऱ्या बाजूला मध्यमवर्गीय आणि सामान्य लोकही या भोंदू महिलेच्या भजनी लागले आहेत. लोकांचे हे तर्कविसंगत, अशास्त्रीय, अनिष्ट वर्तन पाहून आजही लोकांच्या जगण्यात कार्यकारणभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन अनुपस्थित असल्याचे स्पष्ट दिसते.



अशा या फसवणूक करणाऱ्या भोंदू महिलेसह तिच्या साथीदारांचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुणे शहर शाखेचे कार्यकर्ते आणि पोलिसांनी १६ डिसेंबर रोजी स्टिंग ऑपरेशन करून पर्दाफाश केला. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या पाषाण परिसरातील २३ वर्षीय पीडित युवकाने या प्रकरणात पुढाकार घेतला. या सगळ्या प्रकारातील गांभीर्य लक्षात घेऊन प्रसारमाध्यमांनी मोठ्या प्रमाणात या प्रकरणात आवाज उठवला. सदर महिलेने कार्यालय बंद केले आहे. या प्रकरणाची मोठी चर्चा झाली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारा विद्यार्थी मानसिक नैराश्य आले म्हणून औषधोपचार घेण्याऐवजी कर्मकांड करणाऱ्या महिलेकडे जातो, याबद्दल आश्चर्य व्यक्त झाले. स्पर्धा परीक्षा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अस्थिरता ताणतणाव असून अनेक विद्यार्थी घाबरलेल्या अवस्थेत असतात. त्यातून असे शॉर्टकट अवलंबले जातात. बी.एस्सी, बी.एड. असे शिक्षण घेतलेली ही महिला समुपदेशनाच्या नावाखाली शास्त्रीय उपचार करण्याऐवजी लोकांना कर्मकांड, काही सांगून फसविते. लोकांच्या अज्ञानाचा, अगतिकतेचा, अडचणींचा गैरफायदा घेऊन त्यांना विसंगत सल्ले देते. ही महिला अशा भक्तांकडून प्रत्येक वेळी एक हजार रुपये घेते. ती हे सगळे कन्सल्टन्सीच्या नावाखाली करत आहे. दररोज साधारण पंधरा ते वीस भक्त येतात. अर्थात महिन्याला साधारण पाच ते सहा लाख रुपये इतकी या भोंदू महिलेची कमाई आहे. भक्तांना काय मिळत असेल? तर ते काही क्षणांचे समाधान. बाकी आजार, समस्या या जागेवरच राहतात. उलट योग्य निदान न झाल्याने प्रश्न जटिल बनत जातात. त्यावेळी या सगळ्यावर ठरलेले उत्तर असते की, 'नशीबातच नव्हते'.

वृषाली संतोष ढोले शिरसाठ (वय-३९ रा. वंशज गार्डन, पाषाण) या महिलेसह साथीदार माया राहुल गजभिये (वय-४५, रा. विठ्ठलनगर, पाषाण), सतीश चंद्रशेखर वर्मा (वय-३३, रा. गणेश होस्टेल, पाटीलनगर, बावधन) आणि अन्य साथीदार जादूटोणा, भोंदूगिरी आणि फसवणूक करत असल्याची माहिती मला नोव्हेंबर महिन्यात पीडित तरुणाने दिली होती. स्पर्धा परीक्षांमध्ये अपयश आल्याने हा युवक सप्टेंबर २०२१

मध्ये नैराश्येमध्ये गेला होता. त्याला वृषाली ढोले शिरसाठ ही महिला समुपदेशक असल्याची सोशल मीडियावरील जाहिरात पाहून माहिती मिळाली होती. त्यामुळे तो युवक या महिलेकडे उपचारासाठी जाऊ लागला. पहिल्याच भेटीच्यावेळी त्याला कोणतीही समस्या न विचारता या महिलेने त्याची अतींद्रिय शक्तीने समस्या ओळखल्याचे सांगितले. त्याचे आयुष्य वयाचया ३० वर्षापर्यंतच आहे. अशी भीती घालून ते वाढविण्यासाठी अलौकीक शक्तीची कृपा असलेला गंडा हातात बांधण्यास सांगितला. तसेच त्याला राख  खाण्यास दिली. असे सतत दोन वर्षे या युवकाशी घडले. त्याने या युवकाच्या घशाला इजा झाली आणि त्याला पोटाचा विकार झाला. सदर महिलेने तिच्या अंगात अतींद्रिय शक्ती असल्याचे सांगून गंडा न बांधल्यास त्याला मृत्युची भीती घातली. नैराश्य आणि आर्थिक अडचण दूर होण्याचा चमत्कार घडेल, औषध उपचार घेण्याची गरज नाही असे वारंवार त्या युवकाला ही महिला सांगत होती. दोन वर्षे हा युवक या महिलेकडे सतत जात होता. प्रत्येक वेळी एक हजार रुपये कन्सल्टन्सी फी त्याच्याकडून घेतली जात होती. त्यातून या युवकाची सुमारे दीड लाख रुपये अर्थिक फसवणूक झाली होती. या महिलेने युवकाकडून अनेकदा स्वतःची पूजा करून घेतली, त्याला पाय धुतलेले पाणी प्यायला दिले. त्यामुळे त्याला पोटाचे विकार झाले. या महिलेने सदर युवकाचे मित्र आणि नातेवाईक यांनाही शारीरिक व मानसिक आजार बरे करण्यासाठी घेऊन येण्यास सांगून त्यांचीही फसवणूक केली. आपण फसवले जात, याची जाणीव झाल्यानंतर या युवकाने त्या महिलेला विचारणा केली, तर या महिलेने त्या युवकाला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे या तरुणाने पोलीस आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे न्यायासाठी धाव घेतली.










युवकाने त्याची फसवणूक झाल्याप्रकरणी न्याय मिळवून देण्यासाठी मदत मागितली. त्यासंबंधी मला निवेदन दिले. त्यानंतर मी महा. अंनिस पुणे शहर शाखेच्या कार्यकर्त्यांशी या प्रकरणाबाबत चर्चा केली. या महिलेच्या मुक्ता रेसिडेन्सी, पाषाण येथील गुरुदत्त कन्सल्टन्सी कार्यालयाच्या परिसरात जाऊन आलो. मानसिक आधार देण्याचा दावा करण्यापासून ते शारीरिक, कौटुंबिक समस्या दूर करण्याचा दावा करून फसवणूक करणाऱ्या या महिलेबाबत आजूबाजूच्या लोकांकडे आणि भक्तांकडे चौकशी केली. त्यातून खात्री पटली की, ही महिला लोकांची फसवणूक करत आहे. त्यानंतर चतुःशृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे यांची भेट घेऊन त्यांना सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन कारवाईची मागणी केली. बालाजी पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्टिंग ऑपरेशन करण्याचे ठरले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी गुरव यांच्या पुढाकाराने मोहीम आखली. वेळ  घेऊनच वैशाली ढोले शिरसाट यांच्याकडे उपचारासाठी जावे लागते. त्यामुळे मी एकदा माझ्या मोबाईलवरून रिसेप्सनिस्ट माया गजभिये यांना कॉल करून वेळ मागितली. त्यांनी कुणाच्या संपर्कातून येताय? फी माहीत आहे का? असे प्रश्न विचारून मला पुन्हा कॉल करते असे सांगितले. मात्र त्यांनी पुन्हा काही कॉल तर केला नाहीच, पण मी केलेले कॉल देखील उचलले नाहीत. ट्रू-कॉलर वरून माझे नाव आणि त्या अनुषंगाने माझी माहिती त्यांना समजली की काय? असे मला वाटले. त्यामुळे मग दुसऱ्या नंबरवरून कॉल करून वेळ घेण्याचे ठरले. पीडित युवकाच्या मित्राने भावाच्या मोबाईलवरून वेळ घेतली. कुणाल शिंदे असे माझे खोटे नाव सांगितले. लग्न होऊन सहा वर्षे झाली तरी बाळ होत नाही, हे उपचारासाठी येत असल्याचे कारण सांगितले. नगरच्या एका भक्ताच्या परिचयातून येत असल्याचे सांगितल्याने वेळ मिळाली.

१६ डिसेंबर हा दिवस उजाडला. वैशाली शिंदे असे खोटे नाव धारण करून साध्या वेशातील पोलीस गीतांजली कुंभार या माझ्यासोबत पत्नी म्हणून उपचारासाठी येणार असल्याचे ठरले. साध्या वेशातील काही आणि काही वर्दीतील पोलीस अधिकारी, कर्मचारी आम्ही वेगवेगळ्या वाहनाने मुक्ता रेसिडेन्सी येथील गुरुदत्त कन्सल्टन्सी कार्यालयाच्या जवळ पोहोचलो. दिसणार

नाही अशा ठिकाणी वर्दीतील पोलीस आणि त्यांची गाडी थांबली. मी आणि गीतांजली कुंभार कार्यालयात गेलो. रिसेप्शनिस्टची बाहेरची रूम साधारण वीस पंचवीस ग्राहक भक्तांनी गच्च भरली होती. तरीही अनेक लोक कार्यालयाच्या बाहेर बसले होते. आम्ही काउंटरला गेलो तर तिथे माया गजभिये आणि सतीश वर्मा बसले होते. त्यांच्याकडे कुणाल शिंदे असे नाव सांगून एक हजार रुपये भरून नाव नोंदणी केली. माझा तेरावा नंबर होता. यावेळी काहीतरी शंका आली असावी म्हणून माया गजभिये यांनी मला वेळ घेतली होती का? असे विचारले. त्यावर मी त्यांना सांगितले की, रात्री साडेनऊ वाजता आणि सकाळी साडेदहा वाजता तुम्हाला कॉल करून वेळ घेतली आहे. तुम्ही यायला सांगितले म्हणूनच नगरवरून आलो आहे. हे माझे बोलणे ऐकून त्या मग पुन्हा काही बोलल्या नाही. बराच वेळ मग आम्ही दोघेजण ऑफिसच्या बाहेर जाऊन बसलो. त्यानंतर रिसेप्शनिस्टच्या रूममध्ये येऊन बसलो. आमचा नंबर आल्यानंतर आम्हाला आतमधील रूममध्ये सोडण्यात आले. आत जाताना माया गजभिये यांनी सांगितले की, आतमध्ये देवी आहेत. त्यांच्या पायाचे दर्शन घ्या. आतल्या रूममध्ये गेल्यावर तिथे वृषाली ढोले शिरसाठ ही महिला अत्याधुनिक वेशभूषेमध्ये आराम खुर्चीत बसली होती. आम्ही या महिलेच्या पायाचे दर्शन घेतले. त्यानंतर या महिलेने आम्हाला त्यांच्या टेबलासमोरील खुर्च्यांमध्ये बसण्यास सांगितले. ही रूम अत्याधुनिक शोच्या वस्तू, प्रतिमा, सुशोभित, सुव्यवस्थित आणि प्रसन्न वाटावे अशी होती. या महिलेने आम्हाला कोणतीही समस्या न विचारता हातात गंडा बांधून राख खाण्यास दिली. सदर महिला ही अघोरी, अनिष्ट, जादूटोणा प्रकार करुन लोकांना फसवत असल्याची माझी खात्री झाली. तोवर बाहेरच्या रूममध्ये सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी आले होते. त्यांना आतमध्ये बोलावले. पोलिसांनी आतमध्ये येऊन अंधश्रद्धा, जादूटोणा यासाठी वापरल्या जात असलेल्या वस्तू ताब्यात घेतल्या. त्यावेळी सदर महिला त्या वस्तू लपविण्याचा प्रयत्न करत होती. मात्र पोलिसांनी पंचनामा करुन जादूटोण्याच्या वस्तू जप्त केल्या.

भोंदूगिरी करणारी महिला वृषाली ढोले शिरसाठ, साथीदार माया गजभिये, सतीश वर्मा यांच्या विरोधात जादूटोणा विरोधी कायदा कलम ३(२) आणि भारतीय दंड विधान संहिता कलम ४२०, ५०२(२), ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण महा. अंनिसच्या पुणे शहर शाखेचे कार्यकर्ते सम्यक वि. म., लालचंद कुंवर, विनोद लातूरकर, शाम येणगे, स्वप्नील भोसले, मनोहर पाटील आम्ही कार्यकर्त्यांनी पाठपुरावा करून तडीस नेले. पोलिसांनी खूपच सकारात्मक कायदेशीर भूमिका पार पाडली. चतुःशृंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगन्नाथ जानकर, साहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी गुरव, पोलीस उपनिरीक्षक विद्या पवार यांनी स्टिंग ऑपरेशन व गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया केली.

**(लेखक महा. अंनिसचे पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत.)**

●

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे.**

## वर्धा शाखा

**मा. सिध्दार्थ कांबळे, प्रा. डॉ. महेन्द्र सहारे, मा. जनार्दन देशमुख, प्रा. डॉ. कमल रविन्द्र पोटदुखे, प्रा. डॉ. सोनाली बन्सोड, प्रा. डॉ. अर्चना खंडागळे, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित (वर्धा) प्रा. डॉ. सरिता सुरेश गणराज**

## जामनेर शाखा

**प्रदिप मधुकर महाडेश्वर (पनवेल) संजय रघुनाथ जैतपाल (महाड), अशोक भगवान भोईर (कल्याण), सुशिल नारायण शिंदे (बदलापूर), उमेश भागवत पाटील, परमानंद गोपाळ सुरळकर (पुणे), जे. बी. चौधरी, वामन सिताराम पाटील, सहदेव बळीराम निकम, मिलिंद विश्वनाथ चराटे, व्ही. पी. पाटील, ॲड. राजू शिवाजी मोगरे**



# स्मशानभूमीतला वाढदिवस...

**अभय कुंभार ।** मंगरूळ (सांगली)
९१७२८१०२४८

कॉलेजला गेलो; कशी, माहीत नाही, पण मला वाचनाची गोडी लागली. मी उत्साहाने वाचायला लागलो. सन २०१९ मध्ये मी पदवीधर झालो. दीपस्तंभ मनोबल प्रकल्प, पुणे येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत होतो. स्पर्धा परीक्षेचा तासन्तास करावा लागणारा अभ्यास मला रटाळवाणा वाटायचा. अवांतर वाचन अथकपणे करत राहणं, याकडे माझा अधिक कल होता. अशाच अवांतर वाचनात ‘प्रश्न तुमचा, उत्तर दाभोलकरांचे’ हे छोटेसे पुस्तक माझ्या हाती पडले. मी ते सर्व पुस्तक वाचून घेतले. सन २०१३ मध्येच डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुण्यात हत्या करण्यात आली. ते पुरोगामी, विवेकवादी सामाजिक कार्यकर्ते होते, त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली; एवढीच मर्यादित माहिती मला होती. मी माझ्याच विश्वात जगत होतो. विनोद शिरसाठ यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची घेतलेली प्रकट मुलाखत या पुस्तकात जशीच्या तशी छापली आहे. देव म्हणजे काय? भूत म्हणजे काय? श्रद्धा-अंधश्रद्धा यातील फरक यावरील डॉक्टरांचे मत, दृष्टिकोन या पुस्तकात सोप्या शब्दात वाचायला मिळतो. डॉ.दाभोलकरांचे विचार आणि कार्य याबद्दल माझे कुतूहल वाढू लागले.

कुतूहल शमन व्हावे म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पिंपरी, चिंचवड शाखेशी मी स्वतःला जोडून घेतले. मार्च २०२० मध्ये कोविड-१९ चे रुग्ण महाराष्ट्रात सापडू लागले. दीपस्तंभ मनोबल प्रकल्पाला सुट्टी देण्यात आली. मी शिराळा, जिल्हा सांगली या माझ्या गावी परत गेलो. पुण्यात प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली नाही. आठ दिवसात देशभरात लॉकडाऊन पडला.

मी डॉ. दाभोलकरांची व्याख्याने ऐकली, पुस्तके वाचली. परंतु बोलकी पुस्तके अल्प प्रमाणात होती. बरीचशी पुस्तके कोणाकडून वाचून घ्यावी लागली. पूर्वजांनी सांगितलेलेच सगळे करतात, तोपर्यंत भटजी-महाराज सांगतात म्हणून करायचे, परंपरा सांगते म्हणून करायचे, असे माझे चालले होते. परंतु या वाचनानंतर स्वतःच्या कृतींबाबत, विचारांबाबत मी सजग व्हायला लागलो होतो. प्रत्येक गोष्टीला प्रश्न विचारला पाहिजे, आपल्यासमोर येणारी माहिती तपासली पाहिजे व बुद्धीला पटेल ते स्वीकारले पाहिजे; ही जाणीव माझ्यात निर्माण व्हायला लागली.

साधना साप्ताहिकाला बुद्धिजीवी वर्गात मागणी होती. माझ्या गावातील दोन वाचनालयात या साप्ताहिकाची सुरुवात व्हावी, असे मला मनोमन वाटत होते. वाचनालयात चर्चा करून दोन्ही वाचनालयात साधना साप्ताहिक सुरू व्हावे यासाठी प्रयत्न करून व्यवस्था केली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने पंधरा पुस्तके सवलतीच्या दरात मिळत होती. प्रकाशन विभागाशी मी स्वतः बोललो. अंनिसच्या प्रकाशन विभागाशी संपर्क केल्यानंतर वाचनालयांच्या प्रतिसादामुळे अंनिसची पुस्तके गावातील दोन्ही वाचनालयात आली. दोन्ही वाचनालयांच्या संस्थापकांनी त्यासाठी आर्थिक योगदान दिले.

माझा मित्र अक्षय आढाव याला समाजकार्याची प्रचंड आवड. मी त्याला डॉक्टरांचे पुस्तक वाचायला दिले. अक्षयलाही प्रश्न पडू लागले. काहीतरी करायची इच्छा त्याने बोलून दाखवली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सांगली जिल्हा अध्यक्ष प्रा. विजयकुमार जोखे सर आमच्या शिराळा तालुक्यात राहायला होते. जोखे सरांचा मोबाईल नंबर आम्ही शोधून काढला. अक्षयने त्यांच्या भेटीची वेळ घेतली व मला घेऊन तो जोखे सरांच्या घरी गेला. जोखे सरांनी वयाची पंचाहत्तरी निश्चितच ओलांडली होती, तरी त्यांचा उत्साह दांडगा होता. सरांनी आम्हाला म्हटले, ‘व्यक्तिसाठी नाही, तर या विचारासाठी काम करा.’ मंगरूळमधून आजपर्यंत कुणीही आमच्यापर्यंत आलं नव्हतं. मंगरुळात तुमच्या गावात आपण कार्यक्रम घेऊ शकतो.’ सरांचे बोलणे ऐकत राहावे असे वाटत होते. सरांनी आम्हाला मार्गदर्शन व प्रेरणा दिली. समाजमन समजून घ्या, अभ्यास करा, असा सल्ला दिला. सरांशी चर्चा करून आम्ही बाहेर पडलो. सरांशी बोलून, त्यांच्या

नवनवीन कल्पना आणि त्यावरील त्यांच्या मार्गदर्शनाने आमच्या मेंदूला जरा झिणझिण्याच आल्या होत्या. पण गावात कार्यक्रम घ्यायचा असा आम्ही पक्का निर्धार केला.

योगेश हा आमचा वाचनवेडा मित्र. आम्हा दोघांपेक्षा योगेश दोन वर्षांनी मोठा. चार दिवसांनी १७ जूनला योगेशचा वाढदिवस होता. मंगरुळमध्ये थोड्या बाजूला स्मशानभूमी आहे. पलीकडे छोटी लोकवस्ती आहे व समोर कॅनॉल आहे. त्यामुळे स्मशानभूमीजवळील रस्त्याने जाताना लोकांना धास्ती वाटायची. अक्षय, योगेश आणि मी एकत्र आलो होतो. योगेशचा वाढदिवस स्मशानभूमीत रात्री बारा वाजता साजरा करावा का; अशी कल्पना मी मांडली. अक्षयने त्याला अनुमोदन दिले. मुख्य म्हणजे योगेशने याला आनंदाने संमती दिली. तशी ही कल्पना नवीन नव्हती. याअगोदर अनेक ठिकाणी स्मशानभूमीत वाढदिवस साजरे झाले आहेत. मात्र माझ्या गावात हा प्रयोग नवीन होता. योगेशचा मित्र रोहित, प्राचार्य सुवर्णसिंग मस्के सर यांना सहभागी करून घ्यावे, जेणेकरून आपल्या उपक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त होईल, असे अक्षय म्हणाला. छत्रपती शिवरायांच्या विचारांनी प्रेरित असणाऱ्या सुवर्णसिंग सरांमध्ये सामाजिक भान व समाज प्रबोधनाची तळमळ आहे. त्यामुळे सर स्वतः आनंदाने सहभागी झाले. आणखी दोन व्यक्तींना आम्ही सांगितले होते, पण त्यांचे फोन ऐनवेळी बंद.

१६ जून, रात्री साडे अकरा वाजले होते. मी नेहमीप्रमाणे बाहेरच्या खोलीत झोपलो होतो. घरी काहीच सांगितले नव्हते. नियोजन फसले असते तर घरच्यांच्या शिव्या खाव्या लागल्या असत्या; किंवा आधीच विरोध झाला असता. ११.३० ला मला अक्षयचा फोन आला. मी वाटच पाहत होतो. हळूच दरवाजा उघडून दबक्या पावलांनी बाहेर पडलो. गाडी थोड्या अंतरावर होती. पाऊस पडत होता. पुढे योगेश, मध्ये मी, मागे अक्षय तिघे डोक्यावर रुमाल ठेवून स्मशानभूमीत पोहचलो. मागोमाग सुवर्णसिंग सर व रोहित केक घेऊन पोहचले, सर्वांनी पैसे काढून छोटासा केक आणला होता.

स्मशानभूमीत राख होती. कुत्र्यांचे भुंकणे, थंडगार वाऱ्यामुळे हलणारी झाडे, यामुळे फांद्या व पानांचा आवाज, रातकिड्यांची किरकीर. योगेश, सुवर्णसिंग सर, अक्षय, रोहित व मी आमच्याशिवाय दुसरे कोणीही माणूस नव्हते. सर्वप्रथम आम्ही सर्वांनी योगेशला शुभेच्छा दिल्या. बारा वाजता योगेशने मनोगत व्यक्त केले, 'हा माझ्या आयुष्यातला सगळ्यात वेगळा आणि अविस्मरणीय वाढदिवस आहे. मला आनंद आहे. मी सामाजिक भूमिकेतून माझा हा वाढदिवस साजरा करतोय.' एका गाडीवर केक ठेवून दुसऱ्या गाडीची हेडलाइट लावून रोहितने प्रकाश निर्माण केला होता. योगेशने केक कापला. सर्वांनी केक खाऊन आणलेला फरसाण खाल्ला. सुरुवात छान झाली, अशी भावना व्यक्त केली. त्यावेळचे फोटो व व्हिडिओ अजूनही योगेशकडे संग्रही आहेत. पडका वाडा, स्मशानभूमी, बंद घर; तसेच वड, पिंपळ, आंबा या भूतांच्या राहायच्या जागा अशी लोकांची समजूत असते. परंतु निराश, नाउमेद होणाऱ्या व्यक्तींनी थोडा वेळ स्मशानात जाऊन बसले पाहिजे. अबालवृद्धांचे कितीतरी मृतदेह तिथे जळत असतात. आपण जिवंत आहोत, ही किती आत्मविश्वास आणि प्रेरणा देणारी बाब आहे. असा गमतीदार विचार माझ्या मनात आला. सर्वजण आपापल्या घरी गेले. मी दरवाजा उघडला, सावकाश दरवाजा बंद करून दबक्या पावलांनी अंथरुणावर जाऊन आडवा झालो.

दुसऱ्या दिवशी मी स्वतःहून घरी सांगितले. थोडा ओरडा खावा लागला. मी आईला विनंती केली, 'देवाला मी नमस्कार करेन, बाकी मला कुठल्याही कर्मकांडात अडकवू नकोस. मला ते जमणार नाही,' असे मी ठामपणे सांगितले. गावच्या व्हॉट्सअप ग्रुपवर रात्रीचा व्हिडिओ टाकला होता. त्यावर कॉमेंट येत होत्या, 'या पोरांना अक्कल नाही. ही अतिशहाणपणा करायला लागली आहेत. शिकून-सवरून अभ्यास करून नोकरी मिळवायचं सोडून पोरं वाया गेली. तुम्ही बारा वाजता स्मशानात गेला, भूतांची वेळ असेल दोन वाजेची, तर काय?' असा काहींनी युक्तिवाद केला. काहींनी कौतुकही केले. खाजगीत काहींनी मात्र असेच काम करत राहा, अशा शुभेच्छा दिल्या. नंतर शाळा-महाविद्यालयात आम्ही घेतलेले उपक्रम म्हणजे शासनाच्या परिपत्रकाचा भाग होते. ग्रामस्थांच्या जुजबी सहभागाने गावात आम्ही अंनिसचे नऊ कार्यक्रम घेतले.

**(लेखक दृष्टिबाधित असून युवकांसाठी स्पर्धा परीक्षा तयारीसाठी अभ्यासिका चालवत आहे.)**

●

# प्रेम ही जगण्याची सुंदर भावना आहे



**रेश्मा खाडे** । कोल्हापूर
९४२१११४८७९

'प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं...
प्रेम म्हणजे प्रेम असतं...
प्रेमाचा गुलकंद...'

मनाला रुंजी घालणाऱ्या या ओळी वाचून काही आठवतंय का तुम्हाला. हाही एक काळ होता जो प्रेम सुंदर आहे सांगणारा, प्रेम करायला शिकवणारा. हीर-रांझा, रोमिओ-जुलिएटच्या कथा ऐकून प्रेमात रमणारे त्याग समर्पण जाणत होते. प्रेमात कोणी कोणाला दिलेली खोटी आश्वासने नाहीत की कोणाची फसवणूक नाही. ना या प्रेमाच्या भावनेत जात, धर्म, लिंग यांची अडचण असते. ही निव्वळ एका माणसाची दुसऱ्या माणसासाठी निर्माण झालेली प्रामाणिक भावना असते, जी कोणत्या एका नात्यात बंदिस्त करून ठेवावीही लागत नाही.

अगदी स्वप्नवत वाटाव्या अशा सगळ्या गोष्टीत आणि प्रेमळ माणसांत आपण रमलेलो असताना खाडकन जाग यावी. नजरेसमोर, अल्पवयीन मुलीची दगडाने ठेचून हत्या, लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहाणाऱ्या महिलेच्या मृतदेहाचे तुकडे करून फेकले, एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला, जातीबाहेर लग्न केले म्हणून आई व भावाने गळा चिरला, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलीचा लग्नासाठी नकार दिल्याने खून अशा भयानक ओळी याव्यात. डोळे उघडताच आपण आजच्या रुक्ष काळात आहोत याची जाणीव व्हावी. जिथे प्रेम नाही, हिंसा वावरतेय, इतक्या हादरवून सोडणाऱ्या घटना आजूबाजूला घडताहेत.

हे का घडतंय, याची कारणं काय आहेत, ते शोधण्यात कोणालाही रस नाही. यावर उपाय, हळहळ तर सोडाच पण हे कोणत्या लिंगाचे, जाती-धर्माचे हे पाहून निषेध व्यक्त केला जातोय. समाजाने हिंसेकडे दुर्लक्ष करून जगण्याची सवय लावली आहे. आजही अस्तित्वात असणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेने हिंसेला स्थान दिलंय. याच व्यवस्थेने स्त्रियांना दिलेल्या दुय्यम दर्जाच्या स्थानाने त्यांच्यावर गाजवल्या जाणाऱ्या मालकी हक्काने, सतत हिंसा होत राहते. या भावनेतून निर्माण होतं ते विखारी पौरुषत्व.

आपल्या आयुष्यात प्रेमाचा आधार असणारी नाती कितीतरी आहेत. आई-वडील, भाऊ-बहीण, कन्या-पुत्र, आजी-आजोबा अशा कित्येक नाती ही जन्माने मिळाली असली तरी ही एकमेकांवर असलेल्या प्रेमामुळे दीर्घकाळ टिकतात. सोबत राहतात. आपल्याला यात असणाऱ्या प्रेमाला उघडपणे व्यक्त करण्याला काहीच अडचण येत नाही. तसेच मित्र-मैत्रिणी या नात्यांतील प्रेमालाही स्वीकारलं जातं. पण तिथेही असं म्हटलं जातं तुमची मैत्री आहे प्रेम नाही. अजूनही इतर नात्यासारखं हे मैत्रीचं नातंही प्रेमाने जोडलेलं असू शकतं हे मान्य केलं जात नाही. समाजाने घालून दिलेल्या लिंग, जाती-धर्माच्या चौकटीत प्रेमाला बंदिस्त केलं जातं. याच समाजाच्या खोट्या प्रतिष्ठेपायी आज आई-वडील असो की भाऊ- बहीण आपल्याच आयुष्याचा भाग असणाऱ्या व्यक्तीची हिंसा करताना दिसत आहेत. ज्याला समाजमाध्यमे 'ऑनर किलिंग' नांव देत आहेत. पण जन्मापासून प्रेमाने ज्या जीवाला वाढवलं जातं त्याची हत्या करण्याचं धाडस कसं काय होऊ शकतं, मग खरंच या नात्यात प्रेम असतं का हा प्रश्न उपस्थित होतोच. माझं माझ्या मुलीवर खूप प्रेम आहे; पण तिने तिच्या प्रेमासाठी घेतलेला निर्णय चुकीचा म्हणून तिला जगण्याचा अधिकार नाही, याच मानसिकतेचा बळी ठरलेला भाऊ, बहिणीने जाती-धर्माबाहेर निवडलेला जोडीदार चुकीचाच, त्यामुळे आपली प्रतिष्ठा खराब झाली अशी समज होऊन तिची हत्या करतो. जे प्रेम सुंदर आहे म्हणतो ते प्रेम अशी हिंसा करायला भाग पाडतं की, इथली व्यवस्था हे करायला भाग पाडतेय याचा विचार करायला हवा आणि म्हणूनच याला 'डिसऑनर किलिंग' म्हणूयात. कारण कोणाचाही जीव घेणं हे सन्मानाचं असूच शकत नाही. आपण पालक आहोत, मालक नाही; हेही समजून घ्यायला हवं. मुलांना वाढवतानाचा

लिंगभेद न करता समतेने वाढवण्याचे पालकत्व निभवायला हवं. मुलांशी करिअर, शिक्षण या विषयावर बोलत असतोच; पण यासोबतच शरीररचना, त्यात होणारे बदल, लैंगिक शिक्षण, प्रेम, जोडीदार निवडी अशा आयुष्याशी निगडित विषयांवरही मुक्तसंवाद करत राहायला हवं. अगदीच पालक म्हणून असा संवाद नाही करता आला तर समुपदेशक, तज्ज्ञ व्यक्ती डॉक्टर यांचंही मार्गदर्शन त्यांना सोबत राहून द्यायला हवं.

अलीकडेच एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हिंसेच्या घटनांमध्ये वाढ झालेली दिसते. प्रेम एकतर्फी असू शकतं, पण जे समोरच्यावर लादलं जातं, समोरच्याला त्रास देतं, वेळेला जीवही घेतं ते प्रेम असू शकत नाही. जेव्हा समोरच्याच्या निर्णयाचा/निवडीचा आदर असतो तेव्हा एकतर्फी प्रेम ही सुंदर भावनांसह मनात जपता येतं. पण सक्ती होते तेव्हा त्या प्रेमाला 'प्रेम' कसं म्हणावं ! प्रेमात द्वेष, हिंसा, सक्ती नसते तर काळजी, आत्मीयता, सन्मान असतो इतकी साधी गोष्ट का कळत नाही. तर मग प्रेम आणि आकर्षण यातला फरक तरी काय माहीत असणार. एखादी व्यक्ती आवडली, तिच्या व्यक्तित्वातला एखादा पैलू आवडला, तर त्यालाच प्रेम न समजता ते आकर्षण असू शकतं हे समजून घेता येत नाहीय. प्रेमाच्या नात्याचा प्रवास आकर्षणातून जरी सुरू होत असला तरी त्याला पुरेसा वेळ घेऊन मैत्रीमार्गे प्रेमापर्यंत पोहचायचे असते. एवढा संयमही असावा लागतो. त्या व्यक्तीची बाजूही समजून घ्यावी लागते. पुढे जाऊन 'नकार' ऐकून घ्यायचीही तयारी असायला हवी.

प्रेमाच्या नात्यात दोन लोकांची संमती असावी लागते. जसं आपल्याला एखादी व्यक्ती आवडू शकते, अगदी तसंच त्या व्यक्तीला आपण आवडणारही नाही. कोणाच्या तरी 'नाही' चा आदर करणं ही तर प्रेमाची पहिली पायरी असते. प्रेमात समानता असते तर एकतर्फी प्रेमात ती नसते.

अलीकडे हिंसेच्या प्रकारात थोडा बदल होतोय. जर एखाद्या व्यक्तीने नकार दिला, नात्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, तर सोशल मीडियाचा उपयोग केला जातोय. त्या व्यक्तीची बदनामी सुरू केली जाते. अशा स्वरूपात मानसिक त्रास दिला जातो. ही पण हिंसाच म्हणावी लागेल. हिंसा केवळ शारीरिक नाही तर मानसिकही असू शकते.

प्रेम आहे पण लग्न करू शकत नाही म्हणून हत्या. अशा घडलेल्या घटनेत प्रेम आहे. असं कसं म्हणावं. कारण जिथं प्रेम आहे तिथं हिंसा कशी काय असू शकेल? नाते कोणतेही असो त्यात पुरुषांप्रमाणे स्त्रीच्या मतांचा आदर असायला हवा, नाही म्हणण्याच्या अधिकाराचा सन्मान व्हायलाच हवा. तू माझ्याशीच लग्न केलं पाहिजे, माझ्याशीच लैंगिक संबंध ठेवले पाहिजेस, इतर कोणाचाही विचार करायचा नाही असं म्हणत ज्या प्रेमात मालकी हक्काची भावना निर्माण होते व समोरच्या व्यक्तीला गृहीत धरले जाते, त्या व्यक्तीच्या मतांचा आदर नाही, तर ते मुळात प्रेमच नाही.

प्रेम ही समजून घेण्याची, जगण्याची सुंदर भावना आहे. प्रेम म्हणजे हळुवारपणा, संवेदनशीलता. अगदी कबीराच्या या शब्दांप्रमाणे, 'ढाई अक्षर प्यार के, पढे सो पंडित होय.'

**(लेखिका महा.अंनिसच्या कोल्हापूर जिल्ह्याच्या कार्याध्यक्षा आहेत.)**

●

**वाचक प्रतिक्रिया**

'समन्वयाचा कलात्मक प्रयोग: मराठी दास्तांगोई' हा नोव्हेंबर –डिसेंबरच्या वार्षिक अंकातील लेख अतिशय अभ्यासपूर्ण वाटला. सध्या समाजात विद्वेषाचे वातावरण पसरले आहे. जातीधर्मातील लढाया वाढल्या आहेत. राजकीय नेते या सगळ्यांना खतपाणीच घालत आहेत. अशावेळी असे समन्वयाचे वातावरण निर्माण करणारे 'दास्तांगोई' सारखे नाट्याविष्कार मोठ्या प्रमाणावर व्हायला पाहिजेत, जे काम सध्या काही कसदार कलाकार करत आहेत. भाषेची समृद्धी वाढवण्यासाठी सुद्धा हे कलाविष्कार उपयोगी आहेत. कविता, शेरोशायरी, ओव्या, दोहे, गाणी हे सगळं समृद्ध साहित्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा हा एक सुंदर कलात्मक प्रयोग. अशा अनोख्या कलाविष्काराची माहिती करून दिली, त्यासाठी लेखकाचे आभार!

**सुशीला म्हात्रे,** नाशिक



# वारकरी परंपरेतील मुस्लीम

**मदन सोनवणे ।** पारनेर
८०५५८७०८८४

'उचनीच काही नेणें भगवंत
तिष्ठे भाव भक्ती देखोनिया'
–संत तुकाराम महाराज

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत श्रीविठ्ठल हा आपल्या भक्ताची जात, धर्म किंवा सामाजिक स्तर न पाहता त्याच्या अंतःकरणातील भक्ती, प्रेमभाव पाहातो व त्यांची कामे करतो, असा या अभंगाचा अर्थ आहे. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वर माऊली यांनी भगवद्‍गीता या ग्रंथावर मराठीत 'भावार्थ दीपिका'(ज्ञानेश्वरी) हा टीका ग्रंथ लिहून संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना समजेल, उमजेल अशा रीतीने खुले केले. भक्ती व ज्ञानाचा अधिकार हा सर्व जातिधर्मातील जनतेचा आहे, असा संदेश दिला. संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या काळातच प्रत्येक जातीत, धर्मात संत निर्माण झाले. महाराष्ट्र ही संतांची भूमी अशी ओळख तयार व्हायला सुरुवात झाली. ज्या जातीत किंवा धर्मात संतांनी जन्म घेतला ती जात त्यांच्या जात, धर्म त्यांच्या संतत्वाच्या आड येऊ शकली नाही. विविध जातीत, धर्मात जन्म झालेल्या संतांना तत्कालीन जातव्यवस्थेच्या उतरंडीमुळे आपआपल्या जातीला मिळालेले काम करावे लागले. परंतु आपल्या भक्तिप्रेम व निष्काम कर्मयोगामुळे संतांनी देव आपलासा केला, म्हणजेच संत होण्यासाठी माणूस कोणत्या जातीत, धर्मात जन्माला आला हे महत्त्वाचे नसून त्याची भक्ती महत्त्वाची ठरते. परंतु याचा अर्थ असा नाही की, एखादा माणूस कोणत्याही जातिधर्मातील असला तरी संत झाल्यानंतरच आपण त्याला मान्यता द्यावी. माणसाची स्वत:ची स्वत:शी जशी वागणूक आहे तशीच इतर माणसांबरोबर व समस्त प्राणिमात्रांबरोबर असावी, ही संतत्वाची पहिली पायरी आहे. सर्वच संत ही आधी उत्तम माणसे होती. संत होण्यासाठी आधी चांगला माणूस व्हावे लागते.

वारकरी परंपरा इतकी समृद्ध विशाल व सर्वसमावेशक आहे की, महाराष्ट्रातील प्रत्येक जातीत व धर्मात वारकरी परंपरेला मानणारा वर्ग आढळतो. पंढरपूरच्या आषाढी वारीत सर्वच जातीधर्मातील लोक पायी वारी करताना आपल्याला दिसतात. कारण संतांनीच सांगितले आहे की,

'या रे या रे लहान थोर
याती भलती नारी नर'

पंढरीचा वारकरी वारीत आपली जात, धर्म या सर्वांचा अभिमान विसरून विठ्ठलाशी एकरूप झालेला असतो. एकमेकांच्या पायांना स्पर्श करताना कोणीही लहान–थोर असा विचार करत नाही.

'वर्ण अभिमान विसरली याती
एकमेकां लोटांगणी जाती'

थोडक्यात, वारकरी परंपरा ही जगाला विठ्ठलस्वरूप पाहणारी असल्यामुळे कोणताही धर्मभेद, जातिभेद हा अमंगळ मानला गेलेला आहे.

वारकरी पंरपरेतील मुस्लीम याविषयी विचार केला, तर संत कबीर यांचे स्थान खूप महत्त्वपूर्ण ठरते. संत कबीर यांना वारकरी परंपरेत खूप मोठा मान आहे. संत तुकारामांनी आपल्या 'उच्चनीच काही नेणे भगवंत' या अभंगात संत कबीर यांचा उल्लेख 'कबीराचे शेले विणी' असा केला आहे. यातूनच संत कबीर यांचा अधिकार खूप मोठा होता हे स्पष्ट होते. इतर कोणत्याही भारतीय आध्यात्मिक परंपरेत मुस्लीम समाजाला व त्या समाजातील संतांना स्थान दिले गेले नाही. परंतु केवळ वारकरी परंपरेने मुस्लीम समाजाला व त्या समाजातील संतांना सहजतेने स्थान दिले. भारतभर प्रवास करणारे संत नामदेव महाराज यांनी वारकरी परंपरेचा संघटनात्मक व वैचारिक विस्तार करताना सर्वधर्म समन्वयासाठी खूप मोठी मशागत समाजमनाची आधीच करून ठेवली होती.

'सब आलमका रखनेवाला विठ्ठल पंढरपूरवाला!
फकीर उनोंके खूप विराजे सब संतन का हुवा मेला!!'

संत कबीर यांनी पांडुरंगावर रचलेला हा दोहा. संत

कबीर महाराज पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी आले होते, असा स्पष्ट पुरावा या दोह्यातून दिसून येतो. संत कबीर यांचे पुत्र व शिष्य असणारे संत कमाल महाराज पंढरपूर या गावी नंतर स्थायिक झाले. कमाल महाराज यांच्या परंपरेत नंतर अनेक महंत कीर्तनकार होऊन गेले. भक्तीची ही परंपरा सातत्याने पुढे चालू राहिली. १९४५ साली श्रीराम कबीर मठ व फड असे नामाभिधान परंपरेला प्राप्त झाले. पंढरपूर येथे एकादशीला कबीर महाराजांची शैली टोपी, कबीर महाराज, कमाल महाराज यांच्या पादुका पालखीत घालून पालखी प्रदक्षिणा केली जाते. नंतर आरती, नामजप, हरिपाठ, कीर्तन असे कार्यक्रम होतात.

संत सजन कसाई यांचा व्यवसाय मांसविक्रीचा होता. परंतु तो उपजीविकेचा व्यावहारिक भाग आहे. यातून वारकरी संप्रदायाचा विशाल दृष्टिकोन स्पष्ट होतो. विशिष्ट धर्माची, जातीची व्यक्ती मांस खाते, मांस विकते म्हणून आज अनेक ठिकाणी धर्माधर्मात वाद होतो आहे. परंतु वारकरी संप्रदायाने हा खूप मोठा संदेश समाजाला दिला आहे की, माणसाच्या कर्मावरून त्याची उंची ठरत नाही. कर्म हे आसक्तिविरहित केले तर माणूस आध्यात्मिक उंची गाठू शकतो.

वारकरी परंपरेत शेख महंमद महाराज (श्रीगोंदा) यांचे स्थानही महत्त्वपूर्ण आहे. त्यांची अभंगरचना वारकरी मोठ्या आनंदाने भजनात म्हणतात–

'काटे केतकीच्या झाड!
आत फुलला केवडा
शेख महंमद अविंद
त्याचे ह्रदयी गोविंद'

मी अविंद जरी असलो तरी माझ्या ह्रदयामध्ये गोविंद आहे, असे शेख महंमद महाराज म्हणतात. सोळाव्या शतकात संतपरंपरेतील साहित्यक्षेत्रातील महत्त्वाचे स्थान शेख महंमद महाराज यांना आहे. मुस्लीम समाजात जन्म घेऊनही तमाम बहुजन समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी विपुल साहित्यलेखन केले. योगसंग्राम, पवनविजय, निष्कलंक प्रबोध, साठी संवत्सर, स्फुटरचना, अभंग, गायका, मदालिसा, हिंदी कविता, ज्ञानगंगा आदी ग्रंथ त्यांनी लिहिले.

शेख महंमद महाराज यांनी सुफी, वारकरी, दत्त व नाथ या चारही संप्रदायाचा अभ्यास व साधना केली. कादरी संप्रदाय हा सुफी संप्रदायामधील एक उपसंप्रदाय होय. शेख महंमद महाराज यांची गुरूपरंपरा अशी मानली जाते–महंमद गौस–राज महंमद–कादरी चांदसाहेब (चंद्रथर चाँद बोधले) चांद बोधले यांचे शिष्य म्हणजे जनार्दन स्वामी व शेख महंमद महाराज; जनार्दन स्वामीचे शिष्य संत एकनाथ महाराज अशी गुरू परंपरा. सुफी पंथ हा ध्यानधारणा, अनुष्ठान, भजन, पूजन, योगसाधना, अद्वैत तत्त्वज्ञान मानणारा असल्याने वारकरी संप्रदाय व सुफी पंथ यात एक अनुबंध स्पष्ट दिसतो. संत ज्ञानेश्वर माऊली, संत नामदेव महाराज यांनी सर्व समाजाला बरोबर घेऊन केलेले कार्य व समाजातील उच्चनीच जाती, धर्मभेद न करता सर्वांच्या कल्याणाचा विचार देणारी वारकरी परंपरा शेख महंमद महाराज यांना आपलीच वाटली. त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून वारकरी परंपरेत मोलाचे योगदान दिले.

शहा मुंतोजी बहमणी हे बिदर (कर्नाटक) येथील अत्यंत श्रीमंतराज वैभवात आयुष्य जगणारे होते. परंतु एके दिवशी त्यांनी पंढरपूरकडे निघालेली वारकरी दिंडी पाहिली. त्यातील टाळ, मृदंग व विठ्ठल नामाचा जयघोष पाहिला. त्यांचे मन पूर्ण विठ्ठलभक्तीने भरून गेले. मनात, चित्तात प्रापंचिक भोगाबद्दल विरक्ती निर्माण झाली. ते पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघाले. पांडुरंगाचे दर्शन झाल्यानंतर त्यांनी स्वतःचे पूर्ण जीवन विठ्ठलभक्तीसाठी समर्पित केले.

'मिळे संतांची मंडळी
वाजे स्वानंदाची टाळी
कीर्तन घोषाची आरोळी
पळे पळे पाहिती भीमरथी
दक्षिणतीरी परब्रह्म उभे विटेवरी
कटीवरी ध्यान दिगबंर साजिरे'

असे विठ्ठलाचे वर्णन एका अभंगात त्यांनी केले आहे. मुंतोजी यांनी स्वरूपसमाधान, प्रकाशदीप सीताबोध, पंचीकरण यांसारखे अध्यात्म ग्रंथ लिहिले. हिंदू व मुस्लीम ही धर्मातील तत्त्वे व विचार एकच आहेत, असा संदेश त्यांनी आपल्या लेखनातून दिला.

वारकरी परंपरेतील सर्व मुस्लीम संतांनी मानवतावाद, समता, बंधुता, धार्मिक सलोखा या जीवनमूल्यांची शिकवण समाजाला दिली. यामुळेच सर्वसामान्य वारकरी जितका ज्ञानोबा, तुकोबांना मानतो.

तितकाच तो संत कबीर, शेख महंमद महाराज तसेच इतर मुस्लीम संत यांना देखील मानतो. म्हणूनच 'ज्ञानाचा एका, नामयाचा तुका, कबीराचा शेखा' अशी एक भावनिकता वारकऱ्यांमध्ये निर्माण झालेली दिसते.

पंढरीच्या वाटेवर विविध जाती-धर्मातील लोक वारकऱ्यांची सेवा करतात. अन्नदान, उपयोगी वस्तूंचे वाटप, चपला सांधून देणे, थकलेल्या पायांना मालिश करून देणे, अशी अनेक सेवा करणारे विविध जातिधर्मातील बांधव असतात. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन झाल्यानंतर सादल बाबा दर्गा कमिटीकडून वारकऱ्यांचे स्वागत आणि सेवा केली जाते. नाना पेठ येथील मुस्लीमबांधव थकलेल्या वारकऱ्यांचे मालिश करतात. हैदराबाद येथील फिजिओथेरपिस्ट असलेले अब्दुल रझाक खास वारीसाठी हैदराबादवरून येऊन सांधेदुखी, पॅरालेसिस असलेल्या वारकऱ्यांची मसाज करतात.

पालखी लोणंद येथे पोहोचल्यावर मुस्लीम बांधव माऊलीच्या पालखीला खांदा देतात. तारीक बागवान यांचे कुटुंबीय माऊलींना नैवेद्य दाखवतात. यावेळी लोणंद गावातील इतर ठिकाणी सासरी असलेल्या महिला आपलं माहेर लोणंद येथे येतात. विशेष गोष्ट म्हणजे पालखी सोहळ्याचे पावित्र्य राखले जावे म्हणून लोणंदमधील समस्त मुस्लीम बांधव पालखी सोहळा कमिटीला पूर्ण सहकार्य करतो. लोणंद येथील ॲड. बागवान तारीक म्हणतात की, 'माऊलीच्या पालखीनिमित्त सामाजिक सलोख्या जोपासण्याचे काम लोणंदचा मुस्लीम समाज वर्षानुवर्षे करत आला आहे. आम्हाला पालखी कमिटीकडून मानसन्मान दिला जातो. मी स्वत: पांडूरंग आणि माऊली भक्त असणारा वारकरी आहे. हे सेवा काम करून समाधान मिळते.'

माळशिरस तालुक्यातील तोंडले बौडले गावी माऊलीची पालखी आल्यानंतर एका मुस्लीम कुटुंबाकडून माऊलींच्या पालखीतील अश्वांच्या थांबण्याची व्यवस्था केली जाते. अश्वांना हिरवा चारा, पाणी दिला जातो. या अश्वांसोबत असलेल्या लोकांनाही मुस्लीम कुटुंबीय अन्नदान सेवाभावे देतात. ही सेवा करणारे इकबाल मुजावर म्हणतात की, 'वारी सुरू झाल्यापासून पालखीचे अश्व आमच्या घरी विसाव्याला थांबतात. ही परंपरा अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे. माझ्या डोळ्यांसमोर ही आमची तिसरी पिढी अश्व आणि वारकऱ्यांची सेवा करत आहे. गावात आमचं एकमेव मुस्लीम कुटुंब राहते. काही वर्षांपूर्वी गावातील काही तरुणांनी या मुस्लिमांना कशाला द्यायचा पालखीचा अश्व थांबविण्याचा मान, असे म्हणून वाद केला. पण ही परंपरा आम्ही सोडली नाही. शेवटी देवाच्या मनात आहे, म्हणूनच तो आपल्या हातून सेवा करून घेतो.'

इंदापूर येथे संत तुकाराम महाराज यांच्या पालखीतील वारकऱ्यांना मुस्लीम बांधव अन्नदान करतात. अनेक मुस्लीम बांधव प्रेमाने वारकऱ्यांची सेवा करतात. मांडवी ओढा येथे पालखी सोहळा आल्यावर नामदेव महाराज वासकर दिंडीला मुस्लीम बांधव त्यांच्या घरात मुक्कामासाठी जागा देतात.

संत ज्ञानेश्वर माऊली यांची पालखी सासवड येथे दोन दिवस मुक्कामी असते. सासवड येथील ख्वाजाभाई बागवान वारकऱ्यांची सेवा करतात. चहा, फळे, नाश्ता वाटप अशा उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग असतो. त्यांचे वडील महंमदभाई बागवान हे किराणा दुकानाचे मोठे व्यापारी होते. साठनंतरच्या दशकात त्यांनी व त्यांचे इतर व्यापारी मित्र एकत्र येऊन वर्गणी देत असत. वारकऱ्यांसाठी अन्नदानाची व्यवस्था करत. वडिलोपार्जित चालत आलेली वारकऱ्यांची सेवा, परंपरा ख्वाजा भाई मोठ्या अभिमानाने जपत आहेत.

वारकरी संप्रदायाची कीर्तन परंपरा ही एक श्रेष्ठ प्रबोधन परंपरा आहे. संतांनी दिलेला संदेश समाजापर्यंत पोहचविण्यासाठी कीर्तन हे अतिशय महत्त्वाचे माध्यम आहे. ही प्रबोधनाची, भक्ती, ज्ञान, वैराग्याची शिकवण देणारी परपंरा जपण्याचे कार्य काही मुस्लीम कीर्तनकार आजच्या काळात करत आहेत. महाराष्ट्रभर कीर्तन, प्रवचन माध्यमातून संतांनी सांगितलेला मार्ग समाजाला सांगतात. यामध्ये जलाल महाराज सय्यद (निफाड), अमीन महाराज सय्यद, महंमद महाराज, आत्तार महाराज, दोन वर्षांपूर्वी स्वत:च्या कीर्तनातच आपला देहत्याग करणारे ताजोद्दीन महाराज, महिला वारकरी जैतुनबी महाराज सय्यद; (बारामती) (२०१० साली पालखी पुणे येथे असताना निधन) जैतुनबी यांना बालपणापासूनच भजन-कीर्तनाचा छंद होता. मुल्ला मौलवी यांचा विरोध असूनही त्यांनी कीर्तन, प्रवचन माध्यमातून समाजप्रबोधन केले. संत तुकारामांच्या पालखीबरोबर पंढरपूरच्या ८६

वाऱ्या केल्या. २०१० साली ६२ वी वारी करत असताना पालखी पुणे मुक्कामी असताना जैतुनबी यांचे वारीत निधन झाले.

५५ वर्षांपासून पंढरपूरची पायी वारी करणारे हाजीर शिकलगार (मच्छिंद्रगड, सांगली) मोठ्या उत्साहाने सांगतात की, 'धर्माने मुसलमान जरी असलो तरी मी वारकरी आहे. मला मच्छिंद्रनाथाचा आशीर्वाद आहे.' दिंडीत हाजीरभाईंना झेंडेकरी हा मान आहे. बालिंगा (कोल्हापूर) येथील आत्तार कुटुंबीय, नागदेववाडी दिंडीतील वारकऱ्यांची मनोभावे सेवा करतात. बालिंगा येथे दिंडीचा एक विसावा असतो. त्यावेळी भजन, कीर्तन सेवेत आत्तार कुटुंबीय दंग झालेले असतात. गेली ४१ वर्षे ही सेवा आत्तार परिवार करत आलेला आहे.

वारकरी पंथ व मुस्लीम धर्म यामध्ये सलोख्याची परंपरा निर्माण झाली व आजही वारकरी व मुस्लीम बांधव ती श्रद्धेने जपत आहेत. संत तुकाराम महाराज यांची पालखी देहूतून निघाल्यानंतर अनगढशहा बाबा दर्गा येथे विसावा घेते. त्यावेळी मुस्लीम बांधव त्यात सहभागी होतात. हैदराबादचा निजाम याने संत ज्ञानेश्वर मंदिराच्या नगारखाना व दररोज नगारा वाजवण्यासाठी देणगी दिल्याची नोंद ब्रिटिश गॅजेटमध्ये आहे, असे काही अभ्यासक सांगतात. पैठण येथे नाथषष्ठीवेळी सय्यद सादान दर्गा येथे वारकरी दिंड्या मुक्काम करतात. तसेच संत एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूर प्रस्थानवेळी त्या दर्ग्यात वारकरी दिंड्या असतात. मुस्लीम बांधव वारकऱ्यांची सेवा करतात. नमाजवेळी वारकरी भजन थांबवतात व नमाज झाल्यानंतर परत भजन सुरू करतात. नाथपंथातील संत कानिफनाथ महाराज येथे वास्तव्यास होते, अशी एक श्रद्धा आहे. त्या काळात त्यांनी नदीतून रांजणात पाणी भरण्याची सेवा केली असे मानतात. मुस्लीम बांधव संत एकनाथ व कानिफनाथ या दोघांनाही खूप मानतात.

यंदाच्या पालखी सोहळ्यात संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी पुणे मुक्कामी असताना दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांना विनाशुल्क रिक्षा सेवा देणारे दोन मुस्लीम रिक्षाचालक म्हणजे फय्यास मोमीन व आसिफ मोहम्मद सय्यद. या सेवेचे खरोखर समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया यांनी दिली होती.

औसेकर फडकरी भजनाच्या वेळी विणेकरी हिरवा फेटा घालतो. कारण एक मुस्लीम संत पीरपाशा यांनी तो फेटा औसेकर फडकऱ्यांना सन्मान म्हणून भेट दिला होता. ती परंपरा आजही औसेकर फडातील वारकरी जपत आहेत. सोळाव्या शतकातील संत महंमद खान (अमरावती) विठ्ठल-रुखुमाई मंदिरात बसून भजन, कीर्तन करायचे. आयुष्यभर त्यांनी ती सेवा केली. त्यांच्या नावाची पालखी आषाढी वारी वेळी पंढरपुरात येते. त्यांच्या जयंती व पुण्यतिथी वेळी मुस्लीम व हिंदू बांधव उत्साहात सहभागी होतात.

देवगिरी किल्ला येथे रमजानच्या तेराव्या रोजाला कव्वाली व भजनाचा एकत्रित कार्यक्रम असतो. वारकरी व सुफी परंपरेतील मुस्लीम बांधव मोठ्या उत्साहाने एकत्र आलेले असतात. इस्लामपूर (जि. सांगली) येथे संभूआप्पा व बुवाआप्पा (मुस्लीम) असे ग्रामदैवत आहे. या दोघांनी वारकरी परंपरेची सेवा करून धार्मिक सलोख्याचा संदेश दिला. त्यांच्या स्मरणप्रित्यर्थ गावात मोठा उत्सव होतो. हिंदू-मुस्लीम बांधव सहभागी होतात.

'आनंदाचे आवारू मांडू जगा' हा विश्वकल्याणाचा विचार देणारी सर्वसमावेशक व समृद्ध परंपरा म्हणजे वारकरी परंपरा होय. परंतु हल्लीच्या जातीय व धार्मिक अस्मिता टोकदार करून सामाजिक शांतता, धार्मिक शांतता धोक्यात आणणारे राजकारण व सत्ताकारण तसेच जाती-जातीतील व माणसा-माणसांतील भेदांच्या भिंती बळकट करण्याचे कारस्थान काही दुष्ट प्रवृत्ती करत आहेत. या सत्तेच्या धार्मिक उन्मादी खेळाला आजही वारकरी परंपरा छेद देत आहे. काही कीर्तनकार मात्र जातीय धार्मिक सलोखा टिकवण्याची मांडणी कीर्तनातून करण्याऐवजी सलोखा बिघडवण्याची मांडणी करत असतील, तर त्यांनी तशा अर्थाचा एखादा तरी संतांचा अभंग दाखवावा की, ज्यामध्ये इतर जाती-धर्मांचा द्वेष करा असे सांगितले आहे. सर्व संतांनी जातीय व धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. आपल्याला त्याच मार्गावरून जायचे आहे.

'समता कावडी रे कावडी,
माझी नामामृत धरती आवडी रे'

– संत ज्ञानेश्वर माऊली

**(लेखक एस.पी.आय.टी.पॉलिटेक्निक, कुरुंद, ता.पारनेर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.)**

●




# तुकाराम आणि परधर्म जाणिवा...

**विनायक होगाडे ।** इचलकरंजी
९०११५६०४६०

तुका दास राम का । मन में एक हि भाव ।
तो न पालटू आव । ये हि तन जाव ।।१।।
तुका रामसुं चित बांध राखूं । तैसा आपनी हात ।
धेनु बछरा छोर जावे । प्रेम न छुटे सात ।।१।।

हे दोहे वाचल्यावर आपल्याला कदाचित हे अजिबातच पटणार नाही, हे तुकोबांनी लिहिलेले दोहे आहेत. किंबहुना तुकोबा दक्खणी हिंदीत लिहायचे हेच काहींना माहीत नसेल. म्हणजे त्यात बरेचदा फारसी आणि उर्दू शब्दही आलेच. आता प्रश्न असा आहे की, अस्सल मराठी वातावरणात एका ओळख नसलेल्या छोट्या खेड्यात जन्मलेल्या तुकोबांनी या भाषेतही रचना का बरं केल्या असतील? एक गोष्ट आपण मान्यच केली पाहिजे की, तुकोबा हे एक दर्जेदार 'कम्युनिकेटर' होते आणि जो जनमानसासोबत चांगल्या प्रकारे कम्युनिकेट करू शकतो, तो आपला प्रभाव चांगल्या प्रकारे सोडू शकतो. आता उगाच वेगळ्या भाषेत एखादा प्रयोग करून पाहावा, म्हणून काही तुकोबांनी या रचना केल्या असतील, असं तर अजिबातच नसेल, हे नक्की! एका वेगळ्या भाषेतही लिहावं, असं एखाद्याला का वाटेल? कारण, त्या भाषेतही कुणीतरी वाचक आणि चाहते असल्याशिवाय तुकोबांनी असं करणं संभवत नाही. म्हणूनच तुकोबांनी दक्खणीतूनही व्यक्त होणं यासाठीच निवडलं असण्याची शक्यता जास्त आहे. कारण त्यांना मानणाऱ्या समूहामध्ये या भाषेचे लोकही मोठ्या प्रमाणावर असणार आहेत. तुकोबांच्या सतराव्या शतकाचा विचार करता महाराष्ट्रामध्ये सत्तास्थानी असलेल्या मुस्लिमांशिवाय ही भाषा इतर कोणी नियमितपणे बोलणे दुरापास्तच! याचा थेट अर्थ असा होतो की, तुकोबांना मानणाऱ्यांमध्ये मुस्लीमही मोठ्या प्रमाणावर होते.



तुकाराम आणि परधर्म जाणिवा... या आपल्या मूळ विषयाकडे वळण्यापूर्वी हा मुद्दा आधी स्पष्ट होणं फार गरजेचं वाटतं. कारण सध्याचा काळ हा खरं तर खरं काय आणि खोटं काय याचा निवाडा करण्यासाठी अत्यंत जिकिरीचा काळ आहे. थेट काळं आणि पांढरं अशी विभागणी सगळीकडेच झालेली असताना सगळ्याच विषयांकडे अशा दृष्टिकोनातून पाहून सगळं सोयीस्कर करण्याचा घाट धर्मांध शक्ती घालताना दिसतात. म्हणूनच संतपरंपरेची मांडणी आणि त्याचं आकलनही अशाच 'काळ्या-पांढऱ्या' पद्धतीने रुजवण्याच्या अजेंडा दिसतो. वाईट तेव्हा वाटतं जेव्हा 'ज्ञानोबा-तुकोबां'चा वापर हा परधर्मद्वेषासाठी म्हणून केला जातो. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ही खरं तर वारकरी विचार मानण्याची पूर्वअट आहे. असं असतानाही 'भेदाभेदाचा भ्रम' मानण्याला सभ्य बनवणं आणि तेही तुकोबा-ज्ञानोबांच्या नावाने हे करणं अधिक वेदनादायी ठरतं.

हे खरं आहे की, वारकरी संप्रदाय हा हिंदू धर्माचाच भाग मानला जातो. मात्र रूढ सनातन हिंदू धर्मापेक्षा वारकरी विचार अथवा भागवत विचार हा नक्कीच वेगळा आहे. किंबहुना तो तत्कालीन प्रस्थापित सनातन हिंदू धर्माला आव्हान देणारा आहे. तसं नसतं तर वेगळी वारकरी परंपरा सुरू करायची गरजच भासली नसती. कर्मकांड, यज्ञयाग, सोवळं-ओवळं या आणि अशा अनेक गोष्टींना विरोध करून भक्तीचा वेगळा पर्याय देणारी ही चळवळ म्हणून पुढे आली आणि ती गेली कित्येक वर्षे सुरू आहे. म्हणूनच वारकरी विचार हा सरसकटीकरण करून मांडता येण्यासारखा निश्चितच नाही आणि तो प्रस्थापित हिंदुत्वाच्या व्याख्येत तर अजिबातच बसत नाही.

परधर्मद्वेष आणि त्यातही प्रामुख्याने मुस्लीमद्वेष हा

हिंदुत्वाचा पाया आहे आणि वारकरी परंपरा ही सर्व प्रकारच्याच द्वेषाला नाकारते. संत तुकोबा ज्यांना आपले आदर्श मानायचे आणि ज्यांची परंपरा मी पुढे रेटतोय, असा दावा केल्यामुळे रामेश्वर भटाने त्यांच्यावर खटला दाखल केला (तुकोबांसारखा शूद्र स्वत:ला ज्ञानोबांचा वारस म्हणवतो आणि ज्ञानदेवांना वारकरी ठरवतो, हा त्याचा आक्षेप होता. असो!), त्या ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या 'पसायदाना'त काय म्हटलंय? 'भूता परस्परें जडो, मैत्र जिवांचे!' ज्ञानदेव इथे फक्त हिंदूंचं, वारकऱ्यांचं नव्हे वा गेला बाजार माणसांचंही आपापसांत मैत्र अपेक्षित करत नाहीयेत तर ते 'जिवांचं' म्हणजेच माणसांचं प्राणिमात्रांसोबतचंही मैत्र अपेक्षित करत आहेत. म्हणूनच तर ते भव्य अपेक्षा व्यक्त करत म्हणतात 'जो जे वांछिल तो ते लाहो, प्राणीजात!' ओठाला मिशा फुटायच्या वयात हा तरुण 'जिवांच्या मैत्री'ची भाषा बोलतो तेव्हा तो जात-धर्म द्वेषाच्या आणि भेदाभेदाच्याही पल्याड गेलेला असतो.

आता गंमत अशी आहे की, हे पसायदान ज्या ज्ञानेश्वरीची प्रस्तावना वा सार आहे, ती ज्ञानेश्वरी वारकरी संप्रदायाचे अधिष्ठान व्हावी, म्हणून संत नामदेवांनी ज्ञानोबांना गळ घातलेली आहे. त्यापूर्वी वारकरी परंपरेला निश्चित अशा विचारांचं अधिष्ठानच नव्हतं. या दोघांची भेट होणं, हे महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. गेल्या अनेक शतकांच्या महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या जीवनावर या घटनेचे दूरगामी असे परिणाम झाले आहेत. याचं वर्णन करताना लेखक शं. दा. पेंडसे म्हणतात की, 'एक ज्ञानराज होते तर दुसरे भक्तराज!' एक ज्ञानानंतर भक्तीकडे आले होते, तर दुसरे भक्तीनंतर ज्ञानाकडे आले होते. दोघांचं एकत्र येणं एकमेकांना पूरक ठरलं. आधी नाथसंप्रदायाची पालखी वाहणारे ज्ञानोबा नामदेवांच्या प्रभावानंतर वारकरी झाले आणि आजवर फक्त भक्तीतत्त्वावर चालणारी वारकरी चळवळ खऱ्या अर्थाने ज्ञानोपासकही झाली. थोडक्यात, भक्तीला ज्ञानाची जोड मिळाली! या दोन्हीही संतांचा फार मोठा प्रभाव अर्थातच तुकोबांवर आहे. एकनाथ आणि कबीरांचाही आहे. आता कबीरांबद्दल वेगळं काही विश्लेषण करायची गरज नाही. कबीरांचा बराच मोठा प्रभाव तुकोबांवर होता. कारण, तुकोबा कबीरांचे लगेचचे उत्तरकालीन आहेत आणि चार प्रमुख संतांपैकी एक म्हणून तुकोबा मुसलमान असलेल्या कबीरालाही मानतात, ही गोष्ट स्वत:च बरंच काही सांगून जाते. याच कबीरांचे आपण वारस आहोत, असा दावा करणारे शेख महंमद तुकोबांचे चांगले मित्र होते. ते देखील संतत्वाला पोहोचले होते आणि ते तुकोबांचे एकप्रकारे मार्गदर्शकही होते. यासंदर्भातला एक कटू किस्सा मला इथे नमूद करावासा वाटतो. माझ्या 'डियर तुकोबा' पुस्तकाच्या प्रमोशनसाठी फेसबुकवरील एका पोस्टमध्ये मी मुस्लीम व्यक्तीच्या हातात 'डियर तुकोबा' पुस्तक असलेला प्रातिनिधिक फोटो टाकला होता. त्यावर एका समवयस्क मुलीने मला अशी प्रतिक्रिया दिली होती, 'ओह गॉड, सेक्युलॅरिझम! पुस्तक घेणार होते पण आता कॅन्सल...' खरं तर मला तिच्या या प्रतिक्रियेचं वाईट वाटलं नाही. मात्र कीव आली. एका मुस्लीम व्यक्तीच्या हातात 'तुकोबा'असणं ही तिच्या दृष्टीने अत्यंत वाईट आणि आक्षेपार्ह गोष्ट आहे. तिच्या प्रतिक्रियेतून सेक्युलॅरिझमचा आलेला उल्लेखही नकारात्मक आहे. ती कदाचित अनभिज्ञ आहे किंवा तिच्यापर्यंत हे जाणीवपूर्वक पोहोचवलंच गेलं नसावं की, ज्ञानोबा-तुकोबांचा वारकरी संप्रदाय हा सर्वप्रकारच्या 'भेदाभेदाचा भ्रम अमंगळ' मानणारा आहे. तिची जी मानसिकता आहे, तशी अनेकांची सध्या आहे. त्यात तिच्या एकटीचा दोष नाही. 'ज्ञानियाचा एका, नामयाचा तुका आणि कबीराचा शेखा' अशा शब्दांत वारकरी परंपरेचं वर्णन केलं जातं.

आपल्यापैकी कित्येकांना हे माहीत नसेल की, चिकित्सक वृत्तीचे शेख महंमद तुकोबासारखेच लोकांना उपदेश करायचे. ते देखील कविता रचायचे. त्यांच्या कवितांमुळे ते देखील वादग्रस्त ठरले होते. मुस्लीम असूनही वारकरी म्हणवून घेणाऱ्या शेख महंमदांना मुस्लीम आणि हिंदू अशा दोन्ही धर्मातील सनातन्यांशी दोन हात करावे लागले होते. अगदी डियर कबीराप्रमाणेच... आजही त्यांचा दर्गा श्रीगोंद्याला आहे. या शेख महंमदांप्रमाणेच आणखी एक व्यक्तिमत्त्व तुकोबांच्या आयुष्यात महत्त्वाचं आहे. ते आहे अनगडशाह फकीर यांचं.... अनगडशाह तुकोबांच्या प्रभावाने देहूमध्ये आले होते. तुकोबांनीच त्यांच्या गळ्यात तुळशी माळ घातली होती. तेव्हापासून गावाशेजारच्या ओढ्यापलीकडे झोपडी करून ते राहू लागले होते. त्याच ठिकाणी आता त्यांचा दर्गा आहे. तुकोबांच्या पालखीची पहिली आरती या ठिकाणी होते. बाबा अनगडशाह आणि तुकोबा यांची जिथे भेट व्हायची, त्या ठिकाणी त्यांचे अभंग गायले जातात आणि त्यानंतर ही पालखी पुढे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करते. हा प्रसंग

हिंदू–मुस्लीम सलोख्याचं महत्त्वाचं प्रतीक मानला जातो.

या दोन्ही व्यक्ती तुकोबांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या होत्या, ज्यांचं आजवर तुकोबांवरच्या कथा, कादंबऱ्या वा चित्रपटांमध्ये चित्रणच झालेलं नाहीये. 'डियर तुकोबा' मधील मीडिया ट्रायलमध्ये मात्र ही दोन्ही पात्रे महत्त्वाची आहेत. तुकोबांवर धर्मपीठाने खटला दाखल केल्यानंतर झालेल्या टी.व्ही. डिबेटमध्ये तुकोबांची बाजू मांडायला शेख महंमद गेले आहेत, अशी कल्पना आहे. का? तर त्यांच्यातील ऋणानुबंधच तितका गहिरा आहे. जर त्यांच्यातील ऋणानुबंध तितका गहिरा असेल तर त्यांच्यात फूट पाडणारे आपण कोण? डियर तुकोबा हिंदू आहेत आणि डियर शेख महंमद मुस्लीम आहेत, याचा इथे फरक पडत नाही. भागवत धर्म हीच शिकवण देतो आणि देत आला आहे. शेख महंमद स्वत: एके ठिकाणी एका रचनेत म्हणतात की, 'शेख महंमद अविंध, त्याचे हृदयी गोविंद!' द्वेषाचे चष्मे बाजूला ठेवून एकमेकांच्या हृदयातील गोविंद पाहण्यास सांगणारी वारकरी परंपरा खरेच आपल्याला समजली आहे का? हा खरा प्रश्न आहे. यासंदर्भातलाच एक जुना किस्सा फार महत्त्वाचा आहे.

कबीर लतिफ मोमीन मुसलमान ।
सेना न्हावी जान विष्णुदास ।।

तुकोबांनी आपले पूर्वसुरी असलेल्या काही संतांचं वर्णन या अभंगात केलंय. यात संत लतिफांचंही नाव आहे. मोरोपंतांच्या काळात काही लोकांनी अशी मागणी करण्यास सुरुवात केली की, लतिफांचं नाव नका घेऊ, त्यांचं काही नका सांगू! याचं कारण एकच की ते मुसलमान आहेत. तर मोरोपंतांनी असं उत्तर दिलंय की, ते काहीही असो! त्यांची तुकोबांनी स्तुती केली आहे तर मुद्दा इथेच संपतो. ते म्हणतात, 'ख्यात, तुकाराम स्तुत, साधूसभा प्राणवल्लभा, लतिफा स्मरे त्यासी, असो जाती भलती बा!' म्हणजे लतिफ जरी भलत्या जातीचा असला तरी तुकोबांची स्तुती असल्याने आणि ते साधू पुरुष असल्याने तुम्ही त्यांचं स्मरण केलं पाहिजे. वारकरी संप्रदाय हा नाथ संप्रदायाची सांसारिक आवृत्ती आहे. म्हणजे संन्यास न पत्करताही संसारात राहून भक्ती करण्यासाठीचा मार्ग म्हणून वारकरी संप्रदाय पुढे आला. तर नाथ संप्रदायानेही हिंदू–मुस्लीम ऐक्याचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार केला आहे. गोरखनाथांनी हिंदू–मुस्लीम ऐक्याच्या काही रचना लिहिलेल्या आहेत. त्यामुळे स्वाभाविकच नामदेवांपासूनच वारकरी संप्रदायात हिंदू–मुस्लीम ऐक्य आहे.

हिंदू पुजे देहरा, मुसलमान मशीद
नामे सोई सेविया, जहाँ देहरा न मशीद

म्हणजे जिथे देऊळ आणि मशीदीचा भेद नाही, ते ठिकाण म्हणजे वारकऱ्यांचं! म्हणून, त्यांच्या ज्या पाच गवळणी आहेत, ज्यामध्ये मराठी गवळण, गुजराती गवळण, मारवाडी गवळण तशी त्यांची मुसलमानी गवळण पण आहे. म्हणून तुकोबा ज्या संप्रदायाचा भाग होते त्या संप्रदायाने उगम काळापासूनच हिंदू–मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार केल्यामुळे ते संस्कार तुकोबांवर झालेले असणं स्वाभाविकच आहे.

'ख्रिस्तपुराण'हे त्या काळातच मराठीत आलेलं आहे. त्यामुळे तुकोबांना कदाचित तेही वाचायला मिळून ख्रिश्चन धर्माचीही ओळख त्यांना झालेली असणं शक्य आहे. तुकोबा स्वत: व्यापारी असल्याकारणाने त्यांचा या निमित्ताने निरनिराळ्या लोकांशी संपर्क येत असणार आणि फार नसली तरी ख्रिश्चन नावाचा धर्म आहे आणि येशू नावाचा कुणीतरी त्या धर्माचा प्रमुख असून त्याने प्रेमाचा संदेश जगाला दिला आहे, एवढं तरी किमान एक बहुश्रुत व्यक्ती म्हणून तुकोबांना माहीत असणं नक्कीच शक्य आहे. तुकोबांसारखा अभ्यासू माणूस नक्कीच परधर्माचं साहित्य वाचत असणार, हेही शक्य आहे. त्यामुळे, त्यांना बौद्ध, जैन, शीख, महानुभवी, मुस्लीम, ख्रिश्चन या धर्माचं तत्त्वज्ञान माहिती असणं आणि या धर्मांमध्येही त्यांचे चाहते असणं नक्कीच शक्य आहे. शीख धर्मावर तर वारकरी संप्रदायाचा प्रभाव आहे. नामदेव त्यांना वंदनीय आहेत. मुद्दा इतकाच आहे की, तुकोबांचा वारस स्वत:ला म्हणवून घेताना तुम्ही इतर धर्मीयांच्या 'हृदयी गोविंद' पाहण्यास तयार आहात का? तुम्ही 'भेदाभेदाचा भ्रम अमंगळ' आहे, हे अंगीकारण्यास तयार आहात का? बरेचदा हिंदुत्ववादी 'आम्हाला अब्दुल कलाम आणि अशा 'गुणी' मुसलमानांचं काही वावडं नाही, मुस्लीम तरुणांनी त्यांचा आदर्श घ्यावा', असं हिरिरीने सांगत असतात. अगदीच! मात्र हे सांगताना हिंदूंनी मात्र गोळ्या झाडणारा 'नथुराम' व्हावं, अशी त्यांची मनोमन इच्छा असते. तुम्ही तुकारामांचा वारसा चालवणारे होणार की नथुरामाचे? हा खरा कळीचा प्रश्न आहे!

**(लेखक 'डियर तुकोबा' या पुस्तकाचे लेखक आहेत.)**

●



# संगठन गढे चलो!

**विनायक सावळे** । शहादा
९४०३२५९२२६

'संगठन गढे चलो, सुपंथ पर बढे चलो, भला हो जिस में देश का, वो काम सब किये चलो', असं एक सुंदर गीत आहे. एखादी संघटना असावी, समाजाला खूपच गरजेचं असं त्या संघटनेचं समाजात अत्यंत प्रभावी काम असावं, त्या कामाचं समाजाला कौतुकही असावं, ती संघटना सतत प्रवाही आणि वर्धिष्णू असावी, त्यात परस्परसमन्वयाने नि एकजुटीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी असावी. ज्या कोणी व्यक्ती अशा कोणत्याही संघटनेत काम करीत असतील त्यांना वरील वैशिष्ट्ये आपल्या संघटनेत असावीत असे नक्कीच वाटत असणार. ते किती उत्साहात काम करत असतील, आनंदाने काम करत असतील आणि अशा संघटनेचा आपणही एक भाग असावं हे किती सुखद आणि आनंददायी असेल ना! मग प्रश्न असा आहे, खरंच अशी संघटना उभी करता येते का? की ही केवळ आदर्शवादी कल्पनाच आहे? प्रभावी संघटनेची काय वैशिष्ट्ये असतात? महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना म्हणून आपण कुठे आहोत? याचं आत्मपरीक्षण करायला काय हरकत आहे?

कोणत्याही संघटनेचा सर्वंकष विचार करण्याआधी आपण तीन संघटनांची उदाहरणे बघूया. पहिलं उदाहरण, विनोबा भावे यांची 'भूदान चळवळ.' सर्वोदय आंदोलनाने या चळवळीला बळ दिले. ४१ लाख ७६ हजार ८१५ एकर जमीन भूदानात प्राप्त झाली. आपल्याच गावातील भूमिहीन बांधवांना आपल्या मालकीची जमीन दान करण्याचा हा उपक्रम जगातील एकमेव उपक्रम ठरला. सर्वोदय संघाने याचे नेतृत्व केले. पण खरे नेतृत्व हे विनोबांचेच होते. विनोबा अपघातानेच या आंदोलनाचे नेते झाले होते. पण त्यांचा प्रयत्न समूह नेतृत्वाच्या दिशेने होता. कार्यकर्त्यांची शक्ती, शुद्धी आणि निष्ठा वाढवणे ही विनोबांची एक प्राथमिकता होती. पण एवढ्या मोठ्या उंचीच्या महात्म्यालाही त्यांच्यानंतर नेतृत्व आणि संघटना वाढती ठेवता आली नाही (याची सर्वंकष चर्चा करणारे 'अवघी भूमी जगदीशाची' हे पराग चोळकर, साधना प्रकाशन यांचे पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे). परिणामी, आज सर्वोदय आंदोलनात संघटना म्हणून ते बळ राहिलेले दिसत नाही. तो प्रभाव आज पूर्णतः ओसरलेला दिसतो आहे.

दुसरे उदाहरण आपण शेतकरी संघटनेचे घेऊया. एक काळ असा होता जेव्हा शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाला लाख लाख शेतकरी जमत असत. शरद जोशी यांनी उभ्या केलेल्या या आंदोलनाचा प्रभाव काही दशके निश्चितच राहिला. तन, मन आणि धनाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी या आंदोलनाला मिळाली. समाजासह शासनाला याची दखल घ्यावी लागली. शासनाला कायदे करावे लागले. विविध योजना आणाव्या लागल्या. शेतकऱ्यांचा प्रश्न हा राजकीय मुद्दा बनू लागला. पण नंतर मात्र ही संघटनादेखील सुरुवातीचा प्रभाव टिकवू शकली नाही.

तिसरं छोटं उदाहरण घेऊया. माझ्या सहकारी शिक्षक मित्राने शिक्षकांची क्रिकेट टीम तयार केली. नियमितपणे ही मंडळी मैदानावर क्रिकेट खेळू लागली. अनेक सामने भरवू लागली; जिंकू लागली. आनंद आणि उत्साहाचं वातावरण टीममध्ये ओसंडून वाहायचं. रोज सायंकाळी मैदानावर खेळ संपल्यावर एकत्र चहा. परस्परांशी दोस्ती, सुखदुःखात सहभाग. क्रिकेटवीरांची एक संघटनाच उभी राहिली. संख्या वाढल्याने आपापसांतच टीम करून खेळणे सुरू झाले. टीम करण्याच्या पद्धतीत एकदा एकाचे पारडे जड झाले आणि दुसऱ्याचे हलके. त्यातून मतभेद झाले. मतभेद टोकाला पोहोचले. सगळ्यांना नेतृत्वाने बांधून ठेवणाऱ्या शिक्षकाने यातून स्वतःला बाजूला केले. रोज सायंकाळी मैदानावर गेल्याशिवाय न राहणारे खेळाडू शिक्षक, आता खेळत नाहीत. टीम बरखास्त झाली आहे.

तिन्ही उदाहरणे वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीतील आहेत. त्यांच्या संघटना म्हणून

अपयशाची अजून अनेक कारणे शोधता येऊ शकतील. वेगळ्या पातळीवर विश्लेषण नक्की करता येईल. पण या ठिकाणी संघटना म्हणून कोणत्या बाबी आवश्यक आहेत? कोणत्या प्रमुख गोष्टींची काळजी घेतली, तर एक दीर्घकाळ काम करणारे प्रभावी संघटन उभे करता येईल? याची आपल्या अनुभवांच्या आधारे मात्र आपण नक्की चर्चा करू शकतो. ती चर्चा करूया. हे पहा, संघटना आली म्हणजे त्या संघटनेचे ध्येयविधान आले. त्या ध्येयासाठी काम करणारी माणसे आली. त्या माणसांचा नेता आला. त्यांच्या काम करण्याच्या पद्धती आल्या, शिस्त आणि नियम आले, काम करणे म्हणजे प्रत्यक्ष उपक्रम आले, उपक्रमांच्या तयारीसाठी साधने, पैसा, अन्य आवश्यक वस्तू आल्या. मग हे सगळं कायम नीटनेटकं असणं आवश्यक असतं आणि मुळातच हे कायम नीटनेटकं ठेवणं अत्यंत कठीण काम आहे. यातील प्रत्येक गोष्टीची आपण नेमकेपणाने चर्चा करू. कोणत्याही संघटनेत अत्यंत महत्त्वाच्या कोणकोणत्या गोष्टी असाव्यात? तर त्या प्रमुख आठ गोष्टी आहेत. यांना आपण वैशिष्ट्येदेखील म्हणू शकतो. त्या पुढीलप्रमाणे – १. सुस्पष्ट ध्येय, २. कार्यकारिणी, ३. प्रभावी नेतृत्व, ४. प्रशिक्षित कार्यकर्ते, ५. आवश्यक साधने, ६. लोकशाही कार्यपद्धती, ७. प्रभावी संवाद यंत्रणा, ८. सतत सुधारणाशील आणि लवचीक अशी संघटनेची चौकट या आठही गोष्टींची तपशिलाने मांडणी केली, तर एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकेल. परंतु विस्तारभयास्तव आपण थोडक्यात विचार करूया.

**१) सुस्पष्ट ध्येय** : संघटनेला स्पष्ट ध्येय असावे. आपण कोणत्या ध्येयासाठी एकत्र आलो आहोत, याबाबत संघटनेतील सर्व घटकांना स्पष्ट जाण असावी. त्यात जराही संदिग्धता, गोंधळ नसावा. हे ध्येय संघटनेतील सर्व घटकांना वारंवार सांगितले जावे. त्यावर भरपूर चर्चा करत राहिले पाहिजे. कालानुरूप ते तपासत राहिले पाहिजे. बदलत्या काळानुसार गरज असेल त्यानुसार त्यात बदलही करायला हवेत.

**२) कार्यकारिणी** : संघटनेत काम करण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी कार्यकारिणी असते. या कार्यकारिणीला नियम आणि कर्तव्ये असतात, अधिकारही असतात. यातील शक्य तितके नियम हे लिखित स्वरूपात असावेत. त्यांचे कार्यकर्त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले जावे. यातील माणसे योग्य वेळी योग्य पद्धतीने बदलली जावीत. वर्षानुवर्षे त्याच त्या माणसांकडे, तीच ती पदे, कामे असू नयेत. काही माणसे म्हणतात, 'मी काम करेन; पण मला पद नको.' हे आपणास आदर्श वाटत असले, तरीही ही भूमिका आदर्श नाही. पदाशिवाय काम करणारी माणसे संघटनेत असण्यापेक्षा, योग्य माणसे योग्य पदावर संघटनेत असणे अधिक महत्त्वाचे आहे. याची जाण संघटनेत सतत असावी आणि संघटनेतील नेतृत्वाला आणि सर्वांना एका गोष्टीची स्पष्ट समज असावी लागते; ती म्हणजे केवळ नियम आणि कायदे यांनी संघटना चालत नाही, संघटना चालवण्यासाठी भावनिक ओलाव्याची गरज असते. तंत्र हे काम करण्याची पद्धती ठरवते आणि भावनेचा मंत्र काम करण्याची ऊर्जा टिकवून ठेवतो, हे लक्षात घ्यायला हवे.

**३) प्रभावी नेतृत्व** : नेतृत्व प्रभावी कसं ठरतं? तर अधिकाधिक लोकांना सोबत घेऊन, त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन, त्यांची सतत ध्येयप्राप्तीकडे वाटचाल होत राहील, याची काळजी नेतृत्वाने घ्यायची असते. हे तसं कौशल्याचं आणि कठीण काम आहे. जिथे माणसे आली, तिथे हेवेदावे, स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, अपेक्षा, राजी-नाराजी, मान-अपमान हे सगळं आलं. चळवळीमध्ये विचारमंथनाने आणि आचरणाच्या प्रेरणेने यावर मात करण्याची शक्ती नेतृत्वाला उभी करावी लागते. नेतृत्वाच्या व्यक्तिप्रेमाने नाही तर विचारांच्या प्रेमाने काम करणारी माणसे उभी करायची असतात. अर्थातच हे काम आव्हानात्मक आहे आणि आजच्या आर्थिक उदारीकरण, खाजगीकरणाच्या काळात अवतीभवती प्रचंड चंगळवादी प्रभाव असताना, अशा कार्यकर्त्यांचा संग्रह करणे, त्यांना वेगवेगळ्या प्रेरणांनी एकत्र बांधून ठेवणे प्रचंड कष्टाचे आहे. कार्यकर्त्यांना संधी देणे, त्यांच्या आवडी, सवडी नि क्षमतेप्रमाणे अवकाश उपलब्ध करून देणे, प्रेरणा नि प्रोत्साहन देणे, इतरांचे ऐकून घेत स्वतःबद्दल कमीत कमी बोलणे अशा अनेक गोष्टी नेतृत्वाला कराव्या लागतात.

**४) प्रशिक्षित कार्यकर्ते** : कोणत्याही संघटनेत प्रशिक्षित कार्यकर्ते ही त्या संघटनेची खरी ताकद असते; संघटनेचे खरे भांडवल असतात. संघटनेची वैचारिक बैठक व कार्यपद्धतीचे आकलन, त्यानुसार लागणारी कौशल्ये

कार्यकर्त्यांकडे असावीत. त्याशिवाय संघटना प्रभावीपणे काम करू शकत नाही. अपरिपक्व कार्यकर्त्यांमुळे प्रचंड अडचणी निर्माण होतात. सर्व सेवासंघाचे अध्यक्ष, वल्लभ स्वामी यांना सेवाग्राम अधिवेशनात एकदा असे म्हणावे लागले, ''कार्यकर्ते विनोबांना कामाचा अहवाल देतात हे चांगले आहे; परंतु त्यांनी संघटनेलाही तो द्यावा!'' कारण संघनिष्ठेऐवजी येथे व्यक्तिशरणता दिसून येते. व्यक्ती प्रेरणा असू शकतात; पण विचारांच्या प्रेरणेने आणि कार्यपद्धतीच्या चौकटीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी असणे आवश्यक असते. यासाठी कार्यकर्त्यांचे योग्य दिशेने, योग्य पद्धतीने प्रशिक्षण व्हावे लागते.

**५) आवश्यक साधने** : कोणतीही संघटना चालवायची म्हटली म्हणजे तिला साधनांची आवश्यकता असते. निधी हवा असतो. संघटनेच्या अर्थात कार्याच्या किमान गरजा भागतील अशी व्यवस्था करावी लागते. दळणवळणाची साधने लागतात. संघटनेला अशा साधनांची उभारणी करावी लागते आणि ही उभारणी कोणाही एका व्यक्तीच्या किंवा एकाच समूहावर अवलंबून न राहाता, ती लोकआधारित असेल तर चळवळीची वाटचाल दीर्घकाळ चालू राहते. मग अशी संघटना लोकचळवळ बनते. यासाठी संघटनेला सतत समाजात कृतिशीलता टिकविली पाहिजे. आपले संघटन समाजासाठी उपयुक्त आणि गरजेचे आहे याची जाणीव सतत करून द्यावी लागते. त्यासाठी संघटनेला वैचारिकता आणि कार्यपद्धती याबाबत सतत कालसुसंगत रहावे लागते. यासाठी संघटनेला सतत अंतर्गत चिंतन, मूल्यमापन करत राहवे लागते. कालसुसंगत न राहिलेले, एकदा काळाच्या ओघात मागे पडले तर ते संघटन पुन्हा नव्याने उभे राहाण्यासाठी सर्व घटकांची बांधणी करणाऱ्या नव्या नेतृत्वाची गरज असते.

**६) लोकशाही कार्यपद्धती** : आपल्या संघटनेत निर्णयप्रक्रिया कशी आहे? आपल्या मनातील विचार मोकळेपणाने मांडण्यास अनुकूल वातावरण आपल्याकडे आहे का? आपल्या संघटनेत मतभेद व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे का? कोणत्याही विषयावर खुलेपणाने चर्चा करण्याची संधी आहे का? असे अनेक प्रश्न संघटनेच्या लोकशाही कार्यपद्धतीशी संबंधित आहेत. संघटनेची कार्यसंस्कृती यातून दिसून येते. लोकशाही कार्यपद्धती संघटना प्रवाही ठेवण्यासही मदतरूप ठरते. जबाबदारीचे, अधिकाराचे विकेंद्रीकरण करता येते. यातून काम वाढते, विस्तारते, त्यात सुसूत्रता येते.

**७) प्रभावी संवादयंत्रणा** : संघटनेतील ८०% समस्या या केवळ प्रभावी संवादयंत्रणा नसल्यामुळे निर्माण होतात, असे एका सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे. प्रभावी परस्पर संवादयंत्रणा संघटनेचा पाया बळकट करते. संवादाच्या अभावाने प्रचंड गैरसमज निर्माण होतात. कोणत्याही परिस्थितीत संवाद थांबणार नाही, तुटणार नाही याची सगळ्यांनी काळजी घ्यायची असते. संघटनेच्या नेतृत्वावर याची मोठी जबाबदारी असते. एकमेकांशी बोला, एकमेकांबद्दल नको, असे अनेक संवादाचे नियम आहेत. कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणात याचा सहभाग करावा. जिथे संवाद शक्य नाही तेथे मध्यस्थाची मदत अवश्य घेतली पाहिजे. पण संवाद कोणत्याही परिस्थितीत तुटू देऊ नये.

**८) सतत सुधारणाशील आणि लवचीक अशी संघटनेची चौकट** : संघटनेचे ध्येय, रचना, कार्यपद्धतीही सतत तपासली जायला हवी. कालानुरूप आवश्यक तेथे बदल करायला हवेत. समाज बदलत असतो, परिस्थिती बदलत असते, त्यानुसार त्याच्या गरजाही बदलत असतात, तंत्रज्ञान बदलत असते. संघटनेला त्यानुसार आपले ध्येय, रचना, कार्यपद्धती यात बदल करावे लागतात. नाहीतर ती हळुहळू कालबाह्य होत जाते.

या आठ बाबींचा संघटनेत मुख्यत्वे विचार करावा लागतो. संघटना म्हणून कार्याचे मूल्यमापन करीत राहवे लागते. संघटनेची ध्येयधोरणे, वैचारिक बैठक, कार्यपद्धती, रचना यास अनुसरून अनेक संघटनांमध्ये आयुष्यभरासाठी जबाबदारी अंगीकारलेले काही कार्यकर्ते असतात. वरील आठ बाबींचा तपशिलाने विचार आणि आखणी करण्याची जबाबदारीसुद्धा त्यांचीच असते. यासाठी सतत फिरणे, वाचन करणे, चिंतन करणे, चर्चा करणे सातत्याने करीत राहावे लागते. सर्व प्रकारच्या मूल्यमापनाला सामोरे जायची तयारी ठेवावी लागते. चुका मान्य करत त्या दुरुस्त करण्याची भूमिका घ्यावी लागते. मग नक्कीच दीर्घकाळ टिकणारे मजबूत संघटन उभे राहू शकते.

संघटनेबाबत ध्येय, रचना, कार्यपद्धती इत्यादीबाबत

वरीलप्रमाणे सूत्रबद्ध मांडणी व नियोजनातून वाटचाल, असे हे अलिकडील व्यवस्थापनशास्त्र आहे. मात्र ज्या काळात अशी मांडणी होत नव्हती त्या काळापासून महा.अंनिसने कधी जाणीपूर्वक तर कधी सहजपणे या आठही मुद्यांवर बऱ्यापैकी विचार, चिंतन आणि काम केलेले आहे; अशी वाटचाल करीत आजच्या स्थितीला आपण पोहोचलो आहोत. खरंतर संघटना बांधणी या विषयावर जेवढे प्रयोग प्रयत्न हे महा.अंनिसने केलेत, तेवढे अन्य कोणत्याही संघटनेत क्वचितच झाले असावेत. त्यामुळेच अंतर्गत मदभेदांच्या अनुभवातूनही सहज बाहेर पडून संघटनेचे कार्य वर्धिष्णू राहिले आहे. त्याला अंतिम पडाव कधीच नसतो आपल्या प्रयत्नांनी असलेली स्थिती अधिक उंचीवर नेण्यासाठी सतत प्रयत्न करायचे असतात. आपलीच रेघ सतत मोठी करायची असते.

तरीही महा.अंनिस या संघटनेला वरील सर्वच मुद्द्यांवर काम करण्यास खूप वाव आहे. तन-मन-धनाने काम करणाऱ्या, अत्यंत प्रामाणिकपणे संघटनेसाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी संख्या हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे भांडवल आहे. याच भांडवलाच्या आधारे पुढचा प्रवास करावा लागणार आहे. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या एकाही कार्यकर्त्याला अंधश्रद्धामुक्त समाज पाहायला मिळणार नाहीये. म्हणजे जे काम त्याच्या हयातीत सिद्ध झालेले त्याला पाहायला मिळणार नाही असे काम तो प्रामाणिकपणे करीत आहे. कारण मुळातच तो प्रचंड आशावादी आहे. याच पुरोगामी विचारांचा विजय झाल्याचा इतिहास त्याला माहिती आहे. देशातील संत, समाजसुधारकांचा कृतिशील वारसा त्याच्या पाठीशी आहे. भारताच्या संविधानाचा मजबूत पाया या विचारांना मिळालेला आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यासारख्या महान नेतृत्वाचा निर्घृण खून होऊनही तो निराश झालेला नाही. विचारांवर प्रेम करणारे, निष्ठा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांचे हे बळ आहे. पण अजूनही खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. खूप काम करायचे आहे; संघटनेवरही आणि स्वतःवरही. शहीद नरेंद्र दाभोलकर यांचे बलिदान आणि पुरोगामी, परिवर्तनवादी विवेकी विचारांवरील निष्ठा यासाठी आपल्याला बळ देणार आहे. शेवटी विजय आपलाच आहे.

विवेकाचा आवाज बुलंद करूया!

**(लेखक महा.अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक ७ वरून)**

‘संविधान वाचवा’ आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी इतर राज्यांमध्ये जाण्यापूर्वी दक्षिण भारताचा प्रवास करेन.’’

गदर यांचा हा प्रवास विस्मयकारक आहे. परंतु हा त्यांचा प्रवास व्यक्तिगत अजिबात नाही. तो प्रवास सामाजिक आहे, राजकीय आहे. तारुण्यात ते नक्षलवादी विचारांकडे आकर्षित झाले. बंदुकीच्या सांगिनीच्या टोकाने स्थापित केलेले सिंहासन टोकदारच असते. तुम्ही जास्त काळ त्यावर बसू शकत नाही, याची जाणीव त्यांना वेळीच झाली. त्यांनी तो विचार सोडला आणि ‘बुद्धाला शरण गेले’. बुद्ध जो परिवर्तनाचा विचार सांगतो, बुद्ध जो जगण्याचे सम्यक भान देतो, बुद्ध जो रक्तरंजित क्रांति नाकारतो, बुद्ध जो जगण्याचे विवेकी भान देतो, बुद्ध ज्याने जगाला शांतीचा संदेश दिला, त्या बुद्धाला गदर शरण गेले. त्यांनी हातात पंचशील ध्वज घेऊन लोकांना बुद्ध सांगायला सुरुवात केली. मी आंबेडकरवादी आहे, मी बाबासाहेबांनी दाखवलेल्या वाटेने बुद्धाकडे जातोय असे त्यांनी जाहीरपणे सांगितले आणि आपला प्रवास सुरू ठेवला होता. बुद्ध म्हणतात, ‘सारं अनिच्य’ आहे म्हणजेच अनित्य आहे! परिवर्तन निसर्गाचा नियम आहे. विचारही परिवर्तनशील असतात. गदरही परिवर्तनशील होते.

तारुण्यसुलभ आकर्षणाने, गदर जरी अगदी सुरुवातीला नक्षलवादी विचारांकडे वळले होते तरी त्यांनी कधी हातात बंदूक घेतली नाही! बंदुकीच्याऐवजी शब्दांची ताकद मोठी आहे, हे त्यांना चांगलंच समजलं होतं. ते अखेरपर्यंत त्यांच्या गीतांमधून शब्दांना धार देत शोषित, निराधारांची गाणी गात राहिले. त्यांची ही कृती दुर्लक्षित करता येणार नाही! जग बदलाची सुरुवात स्वतःच्या विकारमुक्तीपासून होते, हे बुद्धतत्त्व गदर यांना त्यांच्या शेवटच्या काळात गवसलं! त्यांचा एक नक्षलवादी ते जगाला शांतीचा, करुणेचा, दुःखमुक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या बुद्धाचा स्वीकार असा प्रवास झालेला दिसतो. ही बाब त्यांनी स्वप्न पाहिलेल्या क्रांतीची अतिशय दिशादर्शक, सकारात्मक प्रतिपूर्ती अशी म्हणावी लागेल! त्यांना अखेरच्या काळात जे गवसले ते त्यांचे योग्य शहाणपण आपण अधोरेखित करायला हवं! गदर जेव्हा निसर्गात विलीन झाले तेव्हा अंत्ययात्रा काढण्यात आली. सबंध अंत्ययात्रेमध्ये पंचशील ध्वज दिसत होते. अंत्ययात्रा थांबल्यावर सर्वांनी त्रिशरण, पंचशील ग्रहण केले आणि त्यानंतर गदर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

# राज्य कार्यकारिणी बैठक

साने गुरुजी व कवयित्री बहिणाबाई चौधरी, लोकसेवक मधुकरराव चौधरी व ना. धों. महानोर यांची कर्मभूमी असलेल्या जळगाव जिल्ह्यात शनिवार दि.१३ व रविवार १४ जानेवारी २०२४ रोजी राज्य कार्यकारिणीची बैठक जळगाव शहरातील मंगलम लॉन येथे संपन्न झाली. या राज्य बैठकीच्या सुरुवातीला स्मृतिशेष शेखर सोनाळकर, कडू अण्णा पाटील, डॉ. व्ही. आर पाटील, कुमार शिराळकर, ॲड. मनोहरराव गोमारे, (स्वातंत्र्य सेनानी) कॉ. मुर्गप्पा खुमसे, नागेश सामंत याना आदरांजली व्यक्त करण्यात आली. उद्घाटन जळगाव जिल्हा अंनिसचे अध्यक्ष नेमिचंद धांडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे तर राज्य अध्यक्ष भाई अविनाश पाटील हे यावेळी उपस्थित होते.

बैठकीच्या पहिल्या सत्राचे प्रास्ताविक जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र चौधरी यांनी केले. उद्घाटन सत्रात राज्य अध्यक्ष अविनाश पाटील यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. संघटनेला ३५ वर्षे पूर्ण झाल्या बद्दल राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचे निश्चित करण्यात आले आणि त्यासाठी निधी व दस्ता ऐवज संकलन करण्याचे निश्चित करण्यात आले. बैठकीला २५ जिल्ह्यातील १४० राज्य पदाधिकारी व स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत प्रत्यक्ष संघटनात्मक विभागनिहाय कामकाजाची सुरुवात

**१) संघटना बांधणी**

जिल्हानिहाय मागील चार महिन्यांचा संघटनात्मक व उपक्रमात्मक कामाबद्दलच्या अहवालाचे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सादरीकरण केले.

- संघटनात्मक उपक्रम, कार्यक्रमाबाबत चर्चा झाली. त्यामध्ये जिल्ह्यातील शाखांना प्रत्यक्ष भेटी देऊन शाखा कार्यकारिणी निवड प्रक्रिया पूर्ण करणे.
- प्रशिक्षण संघटनेत घेतलेल्या कार्यकर्त्यांची जिल्हा, राज्य पदाधिकारीपदी निवड करण्यात येईल.
- दि. २१, २८ जानेवारी व ४, ११, १८ फेब्रुवारी २०२४ या तारखांना सर्व जिल्ह्याच्या जिल्हा बैठका राज्य निरीक्षक यांच्या उपस्थितीत घेण्याचे ठरले.
- सर्व शाखा कार्यकारिणी २० फेब्रुवारी पर्यंत मध्यवर्तीकडे पाठविणे.
- पूर्ण वेळ कार्यकर्ते यांनी दरमहा ठरवून किमान २० दिवस संघटनात्मक कामासाठी द्यावेत. त्याचे नियोजन राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, डॉ. ठकसेन गोराणे व त्या विभागातील राज्य सरचिटणीस यांचेशी संपर्क करून करावे. केलेल्या कामाचा अहवाल राज्य कार्याध्यक्ष व प्रधान सचिव याना नियमित सादर करावा.
- संघटनेला ३५ वर्षपूर्तीनिमित्त संविधान स्वीकृती अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ कार्यक्रम घ्यावेत. दि. १५, १६, १७ नोव्हेंबर २०२४ रोजी एक दिवसीय संविधान स्वीकृती राज्यस्तरीय परिषद व संघटनेचे राज्य अधिवेशन घेण्याचे व त्याची पूर्व तयारी आतापासून करण्याचे ठरले.
- वर्षभरात प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन संपर्क शाखा निर्माण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करावे.
- पुढील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक ३१मे, १ व २ जून २०२४ रोजी इस्लामपूर येथे घेण्याचे ठरले.

**२)अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका संपादक व व्यवस्थापक मंडळ**

पत्रिकेचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी मागील चार महिन्यातील कामाचा सविस्तर आढावा घेतला. जाहिराती व देणगी संकलन, वर्गणीदार अंक वितरण, आलेल्या अडचणी व त्यावर केलेली मात, पोस्टाकडून अंकाला मिळालेल्या सवलती, कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी वर्गणीदार होणे याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. अंक अतिशय उत्कृष्ट झाल्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले आणि संपादक व व्यवस्थापक मंडळाचे अभिनंदन केले.

- ज्येष्ठ विचारवंत जगदीश काबरे यांनी पत्रिकेमधील उत्कृष्ट लेखांना पारितोषिक देण्याचे जाहीर केले असल्याची माहिती उत्तम जोगदंड यांनी दिली.
- महाराष्ट्र अंनिसने बुवाबाजीच्या विरोधात पंचवीस लाखाचे आव्हान दिलेले आहे. ते दोन महिन्यातून एकदा पत्रिकेच्या अंकात छापावे असे ठरले.
- पत्रिकेचे व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर यांनी जाहिराती व देणगी यातून संकलित झालेले रक्कम, उधारी आणि वसुली याबाबत माहिती दिली.
- १५ मार्च २०२४ अखेर पर्यंत कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी पत्रिकेचा हिशोब पूर्ण करावा असे ठरले.

- संघटनेला ३५वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ऑगस्टचा अंनिपचा विशेषांक काढण्याचे ठरले.

**३) निधी व्यवस्थापन विभाग**

निधी व्यवस्थापनाबाबत राज्य कार्यवाह परेश शाह व सहकार्यवाह सुधीर निंबाळकर यांनी सविस्तर माहिती दिली.

**४) विविध उपक्रम विभाग**

राज्य कार्यवाह अनिल करवीर यांनी चार महिन्यात २२ उपक्रम राबवल्याचे त्यांनी सांगितले. आगामी उपक्रमांची माहिती तारीखनिहाय नियोजन करून दिली. वारसा संतांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा, विवेकाचा हे अभियान राबवण्याचे ठरले. प्रत्येक जिल्ह्यातील सर्व शाखांनी, आधुनिक अंधश्रद्धांचे पोलखोल अभियान राबवावे. संविधान स्वीकृती अमृत महोत्सवी वर्ष निमित्त राज्यभर ७५ कार्यक्रम घेण्यात यावेत व राज्यस्तरीय परिषद घेण्यात यावी.

**५) बुवाबाजीविरुद्ध संघर्ष विभाग व कायदा व्यवस्थापन विभाग**

अहमदनगर जिल्ह्यातील मोहटादेवी व इंदूरीकर महाराज प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे, याबद्दल ॲड. रंजना गवांदे यांनी माहिती दिली.

- महाराष्ट्रात पुन्हा जातपंचायती डोके वर काढू लागलेल्या आहेत. म्हणून अहमदनगर जिल्ह्यात जातपंचायत विरोधात प्रबोधन परिषदेचे आयोजन करावे. तेथेच कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर ठेवावे असेही ठरले.
- बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी झालेल्या भांडाफोड प्रकरणांची, कामाची माहिती दिली.
- बुवाबाजी विरुद्ध संघर्ष व कायदा व्यवस्थापन विभाग यांनी बैठकीचे नियोजन करावे. मेंटॉर यांनी हे १५ दिवसात नियोजन होईल हे पाहावे.

**६) प्रकाशन व वितरण विभाग**

राज्य सहकार्यवाह नवल ठाकरे यांनी पुस्तक विक्री विभागासाठी स्वतंत्र बँक खाते व सॉफ्टवेअर घेण्याचे ठरले. शासनमान्य यादीत आपल्या प्रकाशनाची पुस्तके यावीत याचा प्रकाशन विभागाने पुढाकार घ्यावा असे ठरले.

**७) प्रशिक्षण विभाग**

या विभागाचे राज्य कार्यवाह सुरेश बोरसे यांनी विभागाचा आढावा घेतला. पुढील काळात प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यावर भर देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. मे महिन्यात ३, ४, ५ या तारखांना राज्य पदाधिकारी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण पुणे येथे घेण्याचे ठरले.

**८) मानसिक आरोग्य विभाग**

या विभागाचे मेंटॉर विनायक सावळे यांनी मानसिक आरोग्य विभागाचा अहवाल सादर केला.

**९) महिला सहभाग विभाग**

राज्य कार्यवाह आरती नाईक यांनी मागील चार महिन्यात झालेल्या कामाची माहिती दिली. जोडीदाराची विवेकी निवड अभियानाचा सुरुवात आणि वारसा (स्त्रीशक्तीचा) या अभियानाच्या समारोप परिषदेचा कार्यक्रम जळगाव येथे अतिशय उत्कृष्टपणे संपन्न झाल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात कोणत्या प्रकारचे प्रबोधन कार्यक्रम, कशाप्रकारे सादर करायचे याबद्दल चर्चा झाली. ८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभासद नोंदणी अभियान राबविण्याचे ठरले.

**१०) युवा सहभाग विभाग**

राज्य कार्यवाह प्रियंका खेडेकर यांनी याबाबतचा अहवाल सादर केला. प्रत्येक जिल्ह्यातील अंनिसच्या शाखेत येत्या वर्षभरात किमान पन्नास युवा सभासद नोंदणी करणे, त्यातील किमान दहा युवा सदर शाखेचे सक्रिय सभासद होतील असे पाहावे. युवा विभागाच्या राज्य कार्यवाह व सहकार्यवाह यांनी विभागनिहाय दौरे करून बैठका घेण्याचे ठरले. दरवर्षी मे मध्ये ठराविक तारखेला राज्यस्तरीय युवा छावणी घेण्यात यावी. त्या अगोदर जिल्हा विभागवार युवा बैठकांचे आयोजन करण्यात यावे असे ठरले.

**११) विवेक वाहिनी**

विवेक वाहिनी उपक्रमासाठी प्रशिक्षण घेण्याचे ठरले. अनेक महाविद्यालयांमध्ये कार्यकर्त्यांनी विवेक वाहिनी सुरू केल्याची माहिती कृष्णात स्वाती यांनी दिली. संघटनेतील प्राध्यापक, प्राचार्य यांनी विवेक वाहिनीसाठी अधिक प्रयत्न करावेत.

**१२) विज्ञान बोधवाहिनी**

राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे व बाबा हलकुडे यांनी कार्य अहवाल दिला. सध्या विज्ञान बोधवाहिनी

लातूर जिल्ह्यात कार्यरत आहे. लातूर जिल्ह्यात १५ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत विज्ञान बोध वाहिनीचे कार्यक्रम होऊ शकतील. त्यानंतरच्या तारखा अन्य जिल्ह्यांना देण्यात येतील.

**१३) कार्यालयीन व्यवस्थापन व हस्तऐवज संकलन विभाग** : याबाबत उत्तरेश्वर बिराजदार यांनी वृत्तांत सांगितला. लातूर येथील राज्य कार्याध्यक्षांच्या कार्यालयात कामासाठी एक संगणक साहाय्यक नेमला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यस्तरीय दस्त ऐवज संकलन व्हॉट्सअॅप ग्रूप सोशल मीडिया यांनी सुरू करावा त्यात सर्व जिल्ह्यांनी शाखानी आपल्या उपक्रमांचे टिपण, फोटो, वर्तमानपत्रातील कात्रणे पोस्ट करावे असे ठरले. प्रत्येक जिल्हा कार्याध्यक्ष व संघटनात्मक विभाग यांनी आपले दर चार महिन्याचे सविस्तर अहवाल पीडीएफ करुन पठवावे, बैठकीत सादर करावेत व वर्षाच्या शेवटी एक वर्षाचा एकत्रित अहवाल पीडीएफ मध्ये डॉ. बिऱ्हाडे व उत्तरेश्वर बिराजदार यांच्या ईमेलवर दस्त ऐवजाचा मजकूर पाठवावा असे त्यांनी आवाहन केले.

**१४) वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प**

राज्य कार्यवाह दिगंबर कट्यारे, सहकार्यवाह प्रकाश कांबळे, विलास निंबोरकर यांनी स्वयं अध्ययन प्रश्नपत्रिका वितरण व शिक्षकांचे प्रशिक्षण याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करणे कामी प्रयत्न चालू आहेत. त्यातला एक भाग म्हणजे महाराष्ट्रातील विविध विभागातील अंधश्रद्धांचे प्रमाण, प्रकार, स्वरूप, दुष्परिणाम याबद्दल कार्यकर्त्यांनी तातडीने शिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याबद्दल विनंती पत्र मा. कुलगुरू यांना लिहावे, असे डॉ. गोराणे यांनी आवाहन केले.

**१५) राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय समन्वय विभाग**

राज्य कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी मागील चार महिन्यात त्यांनी भेटी दिलेली स्थळे व संघटना याबद्दल माहिती दिली. डॉ. घोडेराव यांनी त्यांच्याकडे असलेले देश परदेशातील संपर्क संघटनेकडे द्यावेत. इतर राज्यात संघटनात्मक आदानप्रदान वाढीसाठी प्रयत्न व्हावेत.

**१६) सोशल मीडिया विभाग**

विभागाचे राज्य कार्यवाह कीर्तिवर्धन तायडे यांनी या विभागाची सद्यस्थिती कथन केली. सर्व हँडल्सबद्दलही सद्यस्थिती सांगितली.

- ते नियमितपणे समर्पक इमेज पाठवतात, त्याबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.
- mansforglobels@gmail.com या ई-मेलवर प्रत्येक जिल्ह्याच्या प्रमुखांनी विषयनिहाय वर्गवारी करून दस्ता ऐवज पाठवावा, असे ठरले.

या विभागनिहाय चर्चा व निर्णयासोबतच १९ जिल्ह्यांनी त्यांच्या जिल्ह्याचे अहवाल सादर केले. ज्या विभागाचे राज्य कार्यवाह, सहकार्यवाह उपस्थित नव्हते, त्याबद्दल थोडक्यात त्या त्या विभागाचा आढावा घेण्याचा राज्य कार्यकारी समितीने प्रयत्न केला. बैठकीच्या पहिल्या दिवशी सायंकाळच्या सत्रात जळगाव येथील चळवळीचे हितचिंतक, पाठीराखे, समविचारी यांचेशी संवाद झाला. त्यावेळी योगेश पाटील, डॉ. उत्तमसिंग पाटील, डॉ. मिलिंद बागुल, प्रा. सत्यजित साळवे, विवेक सूर्यवंशी, आर. ए. पाटील, प्रा. दिलीप भारंबे, बी. आर पाटील, विवेक पाटील, महेश पोतदार, प्रवीण पाटील, नमिचंद धांडे उपस्थित होते.

राज्य बैठकीच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते राहिलेले लंडनस्थित प्रसिद्ध विचारवंत, लेखक डॉ. संग्राम पाटील व आय.ए.एस.अधिकारी डॉ. राजेश पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी शहाजी भोसले यांनी चमत्कार प्रात्यक्षिके सादर केली.

बैठकीचा समारोप ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य कार्यवाह दिगंबर कट्यारे, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र चौधरी, जिल्हा प्रधान सचिव विश्वजीत चौधरी, सुनील वाघमोडे, प्रल्हाद बोऱ्हाडे, शिरीष चौधरी, कल्पना चौधरी, मीनाक्षी चौधरी, प्रा. दिलीप भारंबे, जितेंद्र धनगर, गुरुप्रसाद पाटील आणि जळगावचे सर्व जुने, नवे कार्यकर्ते पदाधिकारी आदींनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने खूप परिश्रम घेतले.

हम होंगे कामयाब या गीताने बैठकीची सांगता झाली.

**संकलन : डॉ. टी. आर. गोराणे**



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**व्यसनविरोधी अभियान**

**नागपूर :** महा. अंनिस नागपूर व नशाबंदी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुतळ्यासमोर नववर्ष धुंदीत नव्हे तर शुद्धीत साजरी करण्याचा संदेश देण्यात आला. विजय मोकाशी व विनोद पवार या कार्यकर्त्यांचा जिल्हा समाज कल्याण अधिकारी  किशोर भोयर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी सुशीला भगत, शोभा बेले, अमृता या महिलांनी दारूच्या प्रतीकात्मक बाटलीला जोडे-चपला मारून  व्यसनाला बदनाम केले. कार्यक्रमाला मधुकर धंदरे अशोक खोरगडे, विजय बाभुळकर, ताराचंद पखिडे, प्रवीण मोंढे, सतीश तिवारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव आळणे यांनी तर आभार सेवकराम राऊत यांनी मानले.

**पालघर :** चला व्यसनाला बदनाम करूया या अभियानांतर्गत पालघर जिल्ह्यातर्फे त्रिरत्न बुद्ध विहार १४ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने व्याख्यान देण्यात आले. अनिल शोभना वसंत यांनी व्यसनाचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती केली, तर आप्पा लोखंडे यांनी महा.अंनिस बद्दल माहिती सांगितली. या अभियानात अनिल जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**धुळे :** शाखेतर्फे चला व्यसनाला बदनाम करूया या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**कोराडी :** महादूला येथील विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांची मदत घेऊन नशाबंदी मंडळ व महा.अंनिस कोराडी शाखेच्या वतीने व्यसनमुक्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. फेरीच्या दरम्यान विद्यार्थ्यांनी 'नो व्हिस्की नो बियर बियर.. हॅपी न्यू इयर.. हॅपी न्यू इयर..,' अशा लक्षवेधी व्यसनमुक्तीपर घोषणा देत कोराडी परिसर दणाणून टाकला. कामगार नेते चैनदास भालाधरे यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. कार्यक्रमाला जगजीतसिंग, गौरव आळणे, ताराचंद पखिडे, बबनराव गायकवाड, विष्णू अंभोरे, शाळेच्या शिक्षिका रेखा यादव, संध्या चाफलेकर, अर्चना गोडबोले, यांचेसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**जळगाव :** 'द दुधाचा...द दारूचा नव्हे' हा उपक्रमजळगाव शहर शाखेमार्फत महानगरपालिका भवनासमोर राबविण्यात आला. सदर कार्यक्रम प्रसंगी कार्यकर्ते प्रवीण पाटील, आनंद ढिवरे, शक्ती महाजन उपस्थित होते. न्यू वाघ डेअरीचे संचालक विकास वाघ यांचे सहकार्य लाभले.

**डोंबिवली :** शाखेतर्फे नवीन वर्षाच्या स्वागताला, 'द दुधाचा...द दारूचा नव्हे' उपक्रम राबवला. या उपक्रमाला नामदेव म्हात्रे, चंदू दळवी आणि अनंत चौधरी या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आर्थिक सहकार्य केले. या वेळी नागरिकांनी दूधाचा आस्वाद घेतला. या उपक्रमास अशोक आहेर, गुलाब सूर्यवंशी, निशिकांत विचारे तसेच, सुरेखा भापकर, किशोरी गरुड, विनया निपाणे, देवयानी गवळी, आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**घणसोली :** शाखेतर्फे, 'चला व्यसनाला बदनाम करूया'अभियान विद्यादीप विद्यालयात पार पडले. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना, 'प्रतिज्ञा' हा व्यसन विरोधी लघुपट दाखविण्यात आला. अभियानात ज्योती क्षिरसागर, गजानंद जाधव, उत्तम रोकडे व अशोक निकम आदी कार्यकर्ते सहभागी होते.

**मुंबई :** 'चला व्यसनाला बदनाम करूया' या अभियानांतर्गत महाराष्ट्र स्काऊट गाईड यांच्या राज्यस्तरीय शिबिरात नंदकिशोर तळाशिलकर व प्रियांका सवाखंडे यांनी मार्गदर्शन केले. निरोगी आयुष्य जगण्यासाठी दूध पिऊन नववर्षाचे स्वागत करा हा संदेश देण्यात आला.

**जालना :** शाखेच्यावतीने दारूचा नव्हे तर द दुधाचा हा उपक्रम महात्मा गांधी चौकात राबविण्यात आला. दूध

वाटप, प्रबोधन व घोषणा तसेच सभासद नोंदणी अभियान राबविणे असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. जिल्हा व शहर



शाखेचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थिती होते.

**सानपाडा :** नवीन वर्षाच्या स्वागताला, 'द दारूचा नव्हे द दुधाचा' उपक्रम कै. सिताराम मास्तर उद्यानाजवळ राबविण्यात आला. कार्यकर्त्यांनी व्यसनविरोधी फलक हातात घेऊन उपस्थितांशी संवाद साधला व व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश दिला. या अभियानात किरण जोशी, जे. डी. गवई, कुमार भिवगडे व अशोक निकम या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**इस्लामपूर :** 'द दारूचा नव्हे द दुधाचा' कार्यक्रमात व्यसनांचे दुष्परिणाम आणि त्याची माहिती देणारे पोस्टर प्रदर्शन आयोजित केले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दुधाचे वाटप करण्यात आले. प्रा.बी.आर. जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, प्राचार्य डॉ.सुदाम माने, सर्जेराव कचरे, सौ.मनीषा भोसले, डॉ.अर्जुन पन्हाळे, राजाराम वायदंडे यांची भाषणे झाली. जायंटस ग्रुपचे अध्यक्ष नितीन फल्ले, उद्योजक श्रीनिवास आठवले, डॉ. किशोर गावडे, एम.डी.जाधव, डॉ.नितीन शिंदे, प्रा.सतीश चौगुले उपस्थित होते. निलेश कुडाळकर, बजरंग सपकाळ, राहुल पाटील, जितेंद्र भिलवडीकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अजय भालकर यांनी आभार मानले.

**मोहोळ :** नागनाथ विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मोहोळ यांच्या विद्यमाने व्यसनविरोधी रॅली काढण्यात आली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर खारगे, गोपाळ साखरे, मारूती लोंढे, युवक उद्योजक विष्णू विटे, श्रीधर उन्हाळे, धर्मराज चवरे, सुधाकर काशीद, रमेश आदलिंगे, संजय भोसले, दीपक आठवले, अरुण भोसले, धर्मराज चवरे, मोहन व्यवहारे, श्रीधर उन्हाळे, संजव भोसले, महाविद्यालयाचे प्रा. एस.टी. चव्हाण, सी.एन.मुकणे, व्ही. के. व्यवहारे, ए. टी. पवार, व्ही. व्ही. घोंगडे, उ. के. कदम, एस. एच. माळी उपस्थित होते.

**रबाळे :** शाखेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज विद्यालय आंबेडकरनगर (रबाळे) मधील विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. व्यसनापासून लांब राहून निरोगी आयुष्य जगा असा संदेश अविनाश जाधव यांनी दिला. अंनिस जिल्हा सचिव प्रा. अमोलकुमार वाघमारे, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे उपस्थित होते.

**कार्यकारिणी निवड व दिनदर्शिका प्रकाशन**

**लासूर स्टेशन :** महा. अंनिसची शाखा कार्यकारिणी एकमताने निवड करण्यात आली. याप्रसंगी निरीक्षक, जिल्हा पदाधिकारी ब्रम्हगिरी गोस्वामी हे हजर होते. याप्रसंगी अध्यक्ष सतीश पवार यांची फेरनिवड, कार्याध्यक्षपदी जगजीवन सातदिवे, प्रधानसचिवपदी बाबासाहेब जाधव व उपाध्यक्षपदी गौतम गवई यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर बनसोडे, राजाराम नन्नवरे, डॉ. विकास संगेकर, डॉ. गय्यूम शेख, दीपक गायकवाड, प्रशांत दाभाडे, ज्ञानेश्वर वाघचौरे पाटील, मच्छिंद्र पानकर व कार्यकर्ते उपस्थित होते. महा. अंनिस दिनदर्शिका २०२४ याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली

**नाशिक :** महा.अंनिसच्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका वार्षिक विशेषांक २०२३ व महाराष्ट्र अंनिस २०२४ दिनदर्शिका यांचा लोकार्पण कार्यक्रम हुतात्मा स्मारक, नाशिक येथे संपन्न झाला.

**अंधश्रद्धा निर्मूलन कला प्रदर्शन**

२५ डिसेंबर म्हणजे मनुस्मृतिदहन दिन, महा. अंनिस, रायगड जिल्हा यांनी चवदार तळे येथे अंधश्रद्धा निर्मूलन कला प्रदर्शन आयोजित केले होते. कला प्रदर्शनाचे उद्घाटन कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्ष सुधीरजी शेठ यांच्या हस्ते करण्यात आले. या कला प्रदर्शनात जोडीदाराची विवेकी निवड, पुरुष प्रधान संस्कृती, स्त्री-पुरुष समानता, संविधान व त्याची मूल्ये, फसवे विज्ञान, टीव्ही मार्फत पसरवल्या जाणाऱ्या अंधश्रध्दा, जोतिष एक थोतांड, जात व तिचे मानव प्राण्यावर असलेले नियंत्रण, मन व मनाचे आजार, आयुष्यात पुस्तकांचे महत्त्व तसेच डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी (अंधश्रद्धेविरुद्ध) काम करण्यासाठी कशी वाटचाल केली, याबाबींचा समावेश होता. हे प्रदर्शन पाहण्यासाठी आनंदराज आंबेडकर, महाड नगर पालिका मुख्याधिकारी तसेच महाड व इतर जिल्ह्यातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल शाखा आयोजित 'मस्त चाललंय आमचं' हे पथनाट्य महाड येथे विविध ठिकाणी सादर करण्यात आले.

**अंधश्रद्धा निर्मूलनाचा जागर**

**कोल्हापूर :** जिजामाता महाविद्यालय दुर्गमानवाड (ता. राधानगरी) या ठिकाणी हर्षल जाधव व अमृता जाधव यांनी विविध चमत्कारांचे सादरीकरण करून व त्या मागील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अंधश्रद्धेपासून दूर राहून विवेकी आयुष्य जगण्याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांबळे मॅडम यांनी तर आभार सुनील बोधे यांनी मानले

**क्रांतिज्योती सावित्रीबाई जयंती**

**जामनेर :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती महा.अंनिस शाखा जामनेरच्या मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग कार्यवाह डॉ. मोहिनी मोरे यांच्या पुढाकाराने साजरी करण्यात आली. प्रथम अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका विभाग कार्यवाह शोभा बोऱ्हाडे यांनी साऊ गीत म्हटले. नंतर वंदना महाले यांनी सावित्रीमाईंना पुष्पमाला अर्पण केली. यानिमित्ताने महाराष्ट्र अंनिस शाखा जामनेरच्या वतीने सावित्रीमाईंना वंदन करण्यात आले. या प्रसंगी संगीता पाटील, भारती चौधरी, जयश्री पाटील, सुमन पाटील, गीताबाई बोऱ्हाडे, मीरा चौरे आदी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जळगाव जिल्हा प्रधान सचिव प्रल्हाद बोऱ्हाडे यांनी केले तर आभार शाखेचे प्रधान सचिव भीमराव दाभाडे यांनी मानले.

**गडचिरोली :** महा. अंनिस शाखा गडचिरोली व माळी समाज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीमाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी माळी समाजाचे अध्यक्ष फुलचंद गुरनूले, प्रमुख मार्गदर्शक म्हणून विठ्ठलराव कोठारे, पुरुषोत्तम ठाकरे, उपेंद्र रोहनकर उपस्थित होते. कुरखेडा तालुक्यातील उराडी येथे आणि  पुराडा शाखेच्या वतीने पुराडा कॉन्व्हेंट स्कुल येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.उईके सर, खुणे सर, डोंगरवार सर, महिला प्रतिनिधी अल्काताई बोबाटे, श्रीमती झोळेताई, शिक्षिका वैशाली गाहाणे, काजल डोंगरवार, निलिमा पगळे, सौ. लंजे व विद्यार्थीनी उपस्थित होते. चामोर्शी तालुक्यातील घोट येथेही सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य चोपाराम कांबळे, आसिफ सय्यद, मुख्याध्यापिका सौ. विजयश्री कांबळे, मुमताज बेगम आसिफ सय्यद, प्रसिद्धी प्रमुख हेमंत उपाध्ये व इतर निमंत्रित पाहुणे व पदाधिकारी उपस्थित होते.

**भंडारा :** शहरातील भगतसिंग वाड नवीन टाकळी येथे महा.अंनिसच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या वेळी  भावना बोरकर, कविता लोणारे, रजनी सूर्यवंशी, माधुरी राऊत, ज्योती कांबळी, लता लांजेवार, ममता देशकर, जोधरु राऊत विष्णुदास लोणारे, नितेश बोरकर, संतोष राऊत, उपस्थित होते. यावेळी अवनी लोणारे, मयुरी राऊत यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची माहिती देण्यात आली. यावेळी दूध वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन नितेश बोरकर यांनी केले तर आभार साहेल लोणारे यांनी मानले.

**वर्धा :** सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयटक संघटनेच्या अंगणवाडी सेविका मदतनीस कार्यकर्त्यांना महा. अंनिस विवेकवाहिनीच्या वर्धा जिल्हा कार्यवाह डॉ. मंजुषा देशमुख व कविता राठोड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, द्वारकाताई ईमडवार, निखिल जवादे, प्रतिभाताई ठाकूर उपस्थित होते.

**रायगड :** वारसा स्त्री शक्तीचा या अभियानाची स्वागत परिषद रायगड जिल्ह्यातील खोपोलीत संपन्न झाली. खोपोली येथील महिला बचत गटात अभियान घेण्यात आले. या स्वागत परिषदे निमित्त महा.अंनिस शाखा खोपोली यांनी स्त्रियांचे हक्क व अधिकार यांची माहिती देणारे मार्गदर्शन आयोजित केले होते. यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या वकील डॉ. सचिता गायकवाड-जाधव उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित महिलांना स्त्रियांचे संविधानिक हक्क व अधिकार काय आहेत यांची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महिला बचत गटाच्या प्रमुख रश्मिता तुपे, महाराष्ट्र अंनिस रायगड जिल्हा महिला विभाग प्रमुख सुविधा गायकवाड व खोपोली शाखा कार्याध्यक्ष महेंद्र ओव्हाळ हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

**वडवणी (बीड):** शाखेतर्फे सावित्रीबाई फुले यांच्या

जयंतीच्या पूर्वसंध्येला गावातील महापुरुषांच्या चौकातून सावित्रीबाईंच्या स्मारकापर्यंत मशाल रॅली काढण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनानिमित्त अभिवादन सभा आयोजित केली गेली व विद्यार्थी भाषण स्पर्धेचे आयोजन केले गेले. अंधश्रद्धेवर आधारित मराठी शॉर्ट फिल्म क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि माँसाहेब जिजाऊ जयंतीच्या जन्मोत्सवाच्या पर्वावर प्रदर्शित केली.

**अमावास्येच्या रात्री महा. अंनिसची स्मशान भेट**

**शिरूर ताजबंद :** अमावस्येच्या रात्री महा.अंनिस शाखेद्वारा स्मशान भेटीचे परिसरातील जवळपास ७५ जणांचे आयोजन केले होते. यावेळी महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच मच्छिंद्र वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मांचकराव पाटील, मोहीब कादृी, हरिदास तम्मेवार हे होते. तर उपसरपंच सूरज पाटील, द. मा. माने, एम . एम. काझी, सुधीर भोसले, सचिन औरंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**करवीर :** महा. अंनिस शाखे द्वारा आयोजित स्मशान भेटीत हिरवडे हळदी परिसरातील जवळपास ५० विद्यार्थी, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदवून वैचारिक प्रबोधन करून स्मशान भेट साजरी केली. या स्मशान भेटीच्या कार्यक्रमात कृष्णात स्वाती यांनी मार्गदर्शन व चमत्कार सादरीकरण हर्षल जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी हिरवडे खालसा येथील शालेय विद्यार्थी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच यावेळी रेश्मा खाडे, स्वाती कृष्णात, अमृता जाधव, प्रतिज्ञा कांबळे, राहुल सुतार, मोहित पवार, महेश ओलेकर हे कार्यकर्ते उपस्थित होते.

**विधवा प्रथा सन्मान सोहळा**

रायगड जिल्ह्याच्या वतीने श्रीवर्धन तालुक्यातील खुजारे ग्रामपंचायत, विविध समाज मंडळे तसेच पुरोगामी निर्णय घेणाऱ्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. विधवा प्रथा बंदीचा ठरावांन्वये महाराष्ट्र शासनाने दखल घेत समाजात प्रचलित असलेल्या अनिष्ट विधवा प्रथा निर्मूलनकरीता शासन परिपत्रक पारित केले. परिपत्रकानंतर रायगड जिल्ह्यात पहिल्यांदा असा ठराव करण्याचा बहुमान खुजारे गावच्या ग्रामपंचायतने मिळवला होता. या पाठोपाठ श्रीवर्धन तालुक्यातील विविध समाज मंडळांनी या निर्णयाचे स्वागत करत आपल्या गावात असे ठराव करण्यासाठी पुढाकार घेतला. या सर्व पुरोगामी विचाराच्या कृतीचा सन्मान करणे महा.अंनिस चे कर्तव्य समजत श्रीवर्धन तालुक्यातील विधवा प्रथा व अनिष्ट रूढींच्या निर्मूलनासाठी पर्यायाने महिला सन्मानासाठी भरीव कार्य करणाऱ्या संस्था, समाज मंडळे व या पुरोगामी निर्णयांचा अवलंब करत पुढाकार घेणाऱ्या, व्यक्तींचा रायगड जिल्ह्यातर्फे विशेष सन्मान करण्यात आला.

हा सन्मान सोहळा दोन ठिकाणी पार पडला. सकाळी खुजारे गावात कार्यक्रम करण्यात आला. खुजारे गावच्या सरपंच निलावती पवार, ग्रामसेवक शंकर मयेकर, पोलीस पाटील दिलीप खेडेकर, महिला मंडळ अध्यक्ष संगीता काते यांनी हा सन्मान स्वीकारला. तसेच विविध समाज मंडळांसाठी पुरोगामी निर्णय घेणाऱ्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यासाठी बोर्ली पंचतन मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, दिवेटप्पा या ठिकाणी दुसरा स्वतंत्र कार्यक्रम घेण्यात आला.

**आत्मभान ते समाजभान शिबिर**

महा–अंनिस, राष्ट्र सेवा दल व संविधान संवाद समिती आयोजित आत्मभान ते समाजभान शिबिर कोल्हापूर येथील



सोनतळी येथे उत्साहात संपन्न झाले. संवादक डॉ. पीयूषा पाटील यांनी 'माझे शरीर माझे आरोग्य' या विषयाशी संबंधित महत्वपूर्ण माहिती दिली. आनंद पवार यांनी आपल्या सत्रातून समानता विषमता, लिंग, लिंगभाव यासारख्या संकल्पना भाषेमध्ये दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. सत्र तिसऱ्या दिल दोस्ती दुनियादारी. सत्रांमध्ये सचिनने मैत्री आकर्षण व प्रेम या तिन्ही गोष्टीतला फरक सांगितला व त्याचबरोबर त्यातील निखळता कशी असावी हे सुंदर पद्धतीने स्पष्ट केले. हे शिबिर आनंदी जगण्याची प्रेरणा देणारे होते.

●


# गणितप्रेमी

**सूरज उर्मिला सुनील**

समजा तुम्हाला चहा बनवायचाय. त्यासाठी दूध, साखर, चहा पावडर असे साहित्य विशिष्ठ प्रमाणात लागते. पण साखर ग्रॅममध्ये मोजायला आपण वजनकाटा वापरतो का? दूध मोजायला आपण केमिस्ट्रीच्या लॅबमधला मेजरींग फ्लास्क वापरतो का? क्रिकेट खेळताना रोहीत शर्माला सिक्स मारायचा आहे. त्यासाठी एका विशिष्ठ वेगाने, विशिष्ट कोनातून बॅट फिरवणं आवश्यक आहे. पण मग तो बॅटींग करताना खिशात कोनमापक घेऊन बसतो का? हे सगळेच तसे हास्यास्पद प्रश्न आहेत. कारण सर्व प्रश्नांचं एकच उत्तर आहे. आपण 'अंदाज' करतो.

अंदाज करणं आणि अंदाजपंचे उत्तर काढणं हे वेगळं झालं हं. आपण अंदाजे दूध घेतो, पण त्यामुळे २ लोक आले असताना १० लोकांचा चहा बनत नाही. रोहित जरी कोनमापक वापरत नसला, तरी तो काहीही अभ्यास न करता नुसती बॅट फिरवत असता, तर जगातला सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू झाला नसता.

गणित शिक्षणातही हे अंदाज कौशल्य खूप उपयोगी पडते. चौथी-पाचवीची मुले गणितात परिमाणे शिकतात. त्यांना मीटरचे सेंटीमीटर, सेंटीमीटरचे डेकामीटर करणे अशा आकडेमोडीच्या कोलांट्या उड्याही मारता येतात. पण वर्गाच्या खोलीची उंची किती मीटर असू शकेल, याचे त्यांच्याकडून आलेले उत्तर २ मीटर ते ६ मीटर यात कोठेही असू शकते. थोडक्यात, त्यांना माहिती असलेल्या परिमाणांविषयी कोणताच अंदाज त्यांना बांधता येत नाही. मुले जेव्हा परिमाणे शिकत असतात तेव्हा एक प्रकारचा दृक्-अवकाशीय अंदाज बांधणे गरजेचे असते. १ लिटर म्हणजे किती पाणी याचा अंदाज विकसित झाल्याखेरीज पुढे या परिभाषांचा वापर करणे अवघड होते. सूत्रे कळली असली तरी पूर्ण संकल्पना कळणं अजूनही बाकीच राहतं.




आपण सोडवत असलेल्या उदाहरणाचे उत्तर काय असू शकेल, याचा अंदाज बांधणे जमले तर झालेली चूक मुलांच्या चटकन लक्षात येऊ शकते. शेजारील भागाकाराचे उदाहरण घेऊया. भागाकाराच्या नेहमीच्या रीतीने ८२४×४ चे उत्तर काढत गेलो. २६ असे उत्तर मिळाले. पण हे बरोबर की चूक असा प्रश्न पडला. आपल्याला माहितीये की ८००×४ चे उत्तर २०० असते. म्हणजे ८२४ चा भागाकार केल्यावर २०० पेक्षा जास्त उत्तर यायला हवं. दिलेलं उत्तर चुकलंय. चला तर मग हा प्रश्न सोडवुया.

**कोडे क्र. १३**



शेजारील चित्रामध्ये मी ७२२ पानांचे पुस्तक वाचत आहे. तर सध्या मी कोणत्या क्रमांकाचे पान वाचत असेन?

तुमचा अंदाज ९४२३३९५०९७ या व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवा.

**(संदर्भः क्वेस्ट शैक्षणिक संस्था, पालघर)**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेस हार्दिक सदिच्छा!



**मा. श्याम राठोड**
उपमुख्य अभियंता
चंद्रपूर महाऔष्णिक विज केंद्र, चंद्रपूर
पत्ता-क्वार्टर नं.ए-३ सी एस टी पी एस वसाहत
ऊर्जानगर ता. जि. चंद्रपूर ४४२४०४
मो.नं.: ९४०३१५५९९३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्युत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या., उर्जानगर, चंद्रपूर**

**कार्यालय** : सुपर एफ-३५/१, सि.टी.पी.एम.कॉलनी, उर्जानगर, चंद्रपूर-४४२ ४०४. मो.: ०९४०५९००१४८

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १८

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | | ४ | ■ | ५ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | |
| ६ | | ■ | ७ | | ८ | ■ | ९ | | |
| | ■ | १० | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ |
| ११ | | | | | | | | ■ | १२ |
| ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | |
| १३ | | | ■ | १४ | | | १५ | | |
| | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ |
| ■ | १६ | | | | १७ | | | | १८ |
| १९ | | | ■ | २० | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द**

१) एक प्राचीन भारतीय नास्तिक दर्शन.

३) पाणथळ जागेत राहणारा बगळ्यासारखा पक्षी.

६) सिक्किम, प.बंगाल ते बांग्लादेश अशी वाहणारी एक नदी.

७) शरीराची प्रक्रिया वात, कफ आणि पित्त यावर चालते असे सांगणारा प्राचीन वैद्य.

९) महिलांवर चेटूक केल्याचा आरोप करून त्यांचा अमानुष छळ करणारी कुप्रथा.

११) २८ फेब्रुवारी रोजी देशभर हा दिन पाळला जातो.

१३) पाठीत लोखंडी आकडे घुसवून उंचावर लटकवायला लावणारी एक अंधश्रद्धा.

१४) सूर्यप्रकाश आणि कार्बन डाय ऑक्साइड वायु घेऊन अन्न तयार करण्याची वनस्पतींची प्रक्रिया (इंग्रजीत)

१६) 'कॉसमॉस, ए स्पेसटाइम ओडिसी' या विश्वाच्या उत्पत्तीवर आधारित सिरिजचा सूत्रसंचालक.

१९) पुस्तकाचे गाव म्हणून प्रख्यात असलेले महाराष्ट्रातील एक गाव.

**उभे शब्द**

१) इंग्लंडचा वर्तमान राजा.

२) काटकोन त्रिकोणाची सर्वात लांब बाजू.

३) जुन्या कपड्यांना लागणारी एक कीड.

४) उत्क्रांतीच्या शोधाचा जनक.

५) क्षार, मीठ

८) मॅगसेसे, पद्मश्री पुरस्कार विजेते आसामचे प्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ. रवी ***

१०) छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी.

१२) एक नगदी पीक, यापासून वस्त्रे बनतात.

१३) पाण्याचे घन रूप.

१४) एडिसनने शोधून काढलेले ध्वनि यंत्र.

१५) एक विषारी पदार्थ

१६) अशुद्ध रक्त वाहून नेणारी रक्तवाहिनी.

१७) वर्ष, इसवी**

१८) बोटाच्या टोकावरील कडक आवरण.

(उत्तर पुढील अंकात)

**विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र.१७ चे उत्तर :**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १र | ■ | २छ | ■ | ३चा | ■ | ४मा | ■ | ■ | ५तु |
| ६सा | वि | त्री | ७मा | ई | फु | ले | ८ज | यं | ती |
| य | ■ | ■ | र्क्स | ■ | ■ | ■ | नि | ■ | ■ |
| ९न | का | १०शा | ■ | ११हो | का | १२यं | त्र | ■ | १३नॉ |
| ■ | ■ | र्क | ■ | मी | ■ | ग | ■ | ■ | टि |
| १४सा | १५ल | ■ | ■ | भा | ■ | ■ | भ | ■ | ल |
| १६ने | ता | जी | १७सु | भा | ष | १८चं | द्र | १९बो | स |
| गु | ■ | ■ | भे | ■ | ■ | द्र | ■ | ट | ■ |
| २०रु | ई | ■ | दा | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ |
| जी | ■ | २१वा | र | सा | स्त्री | श | क्ती | चा | ■ |

## राज्य कार्यकारिणी बैठक । जळगाव । क्षणचित्रे

### जिल्ह्याचे आणि विभागाचे अहवाल सादर करताना


दिलीप खिवसरा (निमगुळ)


नवल ठाकरे (धुळे)


उत्तरेश्वर बिराजदार (लातूर)


गौरव आळणे (नागपूर)


राज्य पदाधिकारी आणि संयोजक टीम जळगाव


**महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी अधिकारी कल्याण महासंघ**


**यु.डी.गायकवाड**
राज्य अति. महासचिव


**जी.टी.होसुरकर**
लातूर विभागीय अध्यक्ष


**नागसेन कांबळे**
लातूर जिल्हाध्यक्ष


**रमेश मांदळे**
लातूर, ता.कार्याध्यक्ष


**बाबुराव बनसोडे**
लातूर, ता.अध्यक्ष

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीस व त्यांच्या कार्यास हार्दिक सदिच्छा!**


### वाचक प्रतिक्रिया

वार्षिक विशेषांक २०२३ या अंकांची भारतीयत्व किंवा भारताची कल्पना ही मध्यवर्ती कल्पना केंद्रस्थानी ठेवून अनेक अभ्यासकांनी लेख लिहिले आहेत. शतकानूशतके गावगाड्यात एकत्र बंधुभावाने राहणाऱ्या समाजात दुही निर्माण करण्याचं काम अलिकडे सुरू आहे. या पार्श्वभूमीवर या विशेषांका मधील सर्वच लेख डोळ्यात अंजन घालणारे आहेत. 'प्रेम आणि हिंसा'या सदरातून सध्या तरुणाई समोर येत असलेल्या समस्या व वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न डॉ. अनिल डोंगरे, डॉ. प्रदिप जोशी व आरती नाईक यांनी केला आहे. या लेखांतून क्रूरता, हिंसा, पुरुषप्रधानता, लिंगभेद मोठ्या प्रमाणात कमी होईल असे वाटते.

सध्या समाज माध्यमातून सामाजिक विद्वेष मोठ्या प्रमाणात पसरून सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कबिरांचे शेले विणतो, कौशल्याचा राम हा बंधूभाव वाढविणारा लेख महत्त्वाचा आहे. व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी मधून असामाजिक तत्वं वाढत आहे व एखाद्या व्यक्तीला प्रचंड अपमानास्पद भाषेची वागणूक दिली जाते हे चुकीचे आहे. त्या पार्श्वभूमीवर कबिराचा शेला विणण्यासाठी हा लेख अत्यंत दमदार वाटतोय. एकूणच सर्व लेखकांनी दर्जेदार लेख देऊन विशेषांकाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

**भास्कर बनसोडे** (छ. संभाजीनगर)

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक दुसरा, ५ फेब्रुवारी २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 2, 5th February 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात विशेषांकासह ११ मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी / जाहिरात / देणगीचा चेक / ड्राफ्ट / RTGS / NEFT / ऑनलाईन पेमेंट
**‘विवेक जागर संस्था’** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
व्यक्तीसाठी रु. ४००/–
संस्थेसाठी रु. ५००/–

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
‘कल्पतरू’, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
‘कल्पतरू’, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.